cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१३० | गुरूवार दि.३० जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### मोदींविरोधातील एक्सवरील अनेक अकाउंट्सना नोटीस

नवी दिल्ली : दिल्लीसह इतर ठिकाणी झालेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सुरक्षा दलांविरोधात आक्षेपार्ह भाषा वापरून करण्यात आलेल्या पोस्टप्रकरणी दिल्ली पोलिसांनी काही वृत्तसंस्थांच्या सोशल मीडिया अकाउंटसह एक्सवरील अनेक अकाउंटना नोटिस बजावल्या आहेत. या वृत्तानुसार, पोस्टमध्ये आक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्या व्यक्तींची माहिती देण्याची मागणी करत दिल्ली पोलिसांनी संबंधित एक्स अकाउंटना नोटिसा पाठवल्या आहेत. आंदोलनादरम्यान आणि त्यानंतर सोशल मीडियावर अपलोड करण्यात आलेल्या मजकुराचा आढावा घेतल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली आहे. कायद्याचे उल्लंघन झाले आहे का आणि अशा मजकुराचा सार्वजनिक सुव्यवस्थेवर काय परिणाम होऊ शकतो, याचा विचार करून पोलिस अधिकाऱ्यांनी विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील पोस्ट, व्हिडीओ आणि प्रतिक्रिया यांची छाननी केली.

### 'जॉन्सन अँड जॉन्सन' बेबी पावडरमुळे कर्करोग?

वॉशिंग्टन डीसी : अमेरिकेतील दिग्गज हेल्थकेअर कंपनी जॉन्सन अँड जॉन्सन आपल्या बेबी पावडर आणि इतर टॅल्क-आधारित उत्पादनांमुळे ओव्हरीयन कॅन्सर (अंडाशयाचा कर्करोग) होत असल्याचा दावा करणाऱ्या हजारो याचिका निकाली काढण्यासाठी सज्ज झाली आहे. कॉर्पोरेट इतिहासातील सर्वात मोठ्याआणि प्रदीर्घ काळ चाललेल्या न्यायालयीन लढ्यांपैकी एक असलेल्या या प्रकरणात कंपनीने ५.५ अब्ज डॉलर्स (सुमारे ४६,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त) भरण्याची तयारी दर्शवली आहे.

### कोळसा घोटाळ्यात मनमोहन सिंग यांना क्लीन चिट

नवी दिल्ली : कोळसा घोटाळा प्रकरणात दिवंगत माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याविरोधातील समन्स सर्वोच्च न्यायालयाने अखेर रद्द केले आहे. विशेष न्यायालयाने डॉ. मनमोहन सिंग यांना आरोपी म्हणून बजावलेले समन्स रद्द करत सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयने सादर केलेला क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आहे. या निर्णयामुळे डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर सुमारे दोन वर्षांनी या प्रकरणात त्यांना कायदेशीररित्या पूर्णपणे क्लीन चिट मिळाली आहे.

### मध्य प्रदेशातील शेतकरी आक्रमक

भोपाळः महाराष्ट्राच्या शेजारील मध्य प्रदेश या राज्यात शेतकरी आक्रमक झाले आहेत. एमएसपी मूगाची १०० टक्के खरेदी करण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी राजधानी भोपाळमध्ये आंदोलन केले. नर्मदापूरम, हरदा, सीहोर, रायसेन आणि विदिशा यांसह १९ शेतकरी संघटनांतील हजारो शेतकऱ्यांनी पोलिसांनी उभारलेले बॅरिकेड्स तोडत भोपालमधील वीर सावरकर सेतू पार केला करत मुख्यमंत्र्यांच्या निवासाकडे जाण्याचा प्रयत्न केला. या सर्व घडामोडींनंतर मुख्यमंत्री मोहन यादव यांनी आज सायंकाळी शेतकरी नेत्यांशी चर्चा करण्याचा निर्णय घेतला आहे. आज २९ जुलै रोजी भोपाळमध्ये आंदोलक शेतकरी बसच्या छतावर चढून घोषणाबाजी करताना दिसले. यावेळी घटनास्थळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**
**बीड, दि.२८ जुलै २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ३२.५० क्विंटल** | | |
| २,६०१ | २,७३६ | २,६६७ |
| **ज्वारी/हायब्रिड :३१.०० क्विंटल** | | |
| २,४७० | २,८०० | २,६४२ |
| **मका/लोकल: २०.०० क्विंटल** | | |
| २,३२३ | २,३२३ | २,३२३ |
| **तूर : २.०० क्विंटल** | | |
| ७,६०१ | ७,६०१ | ७,६०१ |
| **उडीद : २.०० क्विंटल** | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| **बाजरी:५२.०० क्विंटल** | | |
| २,४०० | २,८४० | २,६५७ |
| **मुग: ४१.५० क्विंटल** | | |
| ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| **सोयाबीन:१.५० क्विंटल** | | |
| ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| **हरभरा: १५.५० क्विंटल** | | |
| ५,००१ | ५,९४० | ५,५०० |

# शेतकरी कर्जमाफीसाठी 'वन टाइम सेटलमेंट'चा पर्याय

## दिर्घकाळ थकीत कर्जातून मुक्तीची संधी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारच्या सहकार विभागाकडून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी सन्मान योजने' ची अंमलबजावणी वेगाने सुरू असून, पहिल्या टप्प्यात १६ लाख ९६ हजार पात्र शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र, काही शेतकऱ्यांच्या खात्यावर दोन लाख रुपयांपेक्षा कमी रक्कम जमा झाल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सहकार विभागाने (वन टाईम सेटलमेंट) योजनेबाबत स्पष्टीकरण दिले आहे.**



सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, नियमित कर्ज असलेल्या शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्यात येणार आहे. मात्र, ज्या शेतकऱ्यांची कर्जखाती दीर्घकाळ थकीत राहून झाली आहेत, त्यांच्यासाठी स्वतंत्र योजना लागू करण्यात आली आहे. राज्यात २०२० नंतर मोठी कर्जमाफी झालेली नसल्याने अनेक शेतकऱ्यांची कर्जखाती थकीत होऊन झाली आहेत. या खात्यांना पुन्हा सुरळीत करण्यासाठी सरकारने योजना आणली आहे. या योजनेअंतर्गत शेतकरी आणि बँक यांच्यात तडजोड करून थकीत कर्ज खाते पूर्णपणे निरंक (शून्य) करण्याची संधी दिली जाते. कर्ज घेतलेल्या कालावधीनुसार ठराविक टक्केवारीची रक्कम भरल्यानंतर उर्वरित थकबाकी माफ करून खाते बंद केले जाते. ३० सप्टेंबर २०२१ पर्यंतचे कर्ज : एकूण थकीत कर्जाच्या ३५ टक्के रक्कम भरल्यास खाते निरंक करता येईल., १ ऑक्टोबर २०२१ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंतचे कर्ज : ४५ टक्के रक्कम भरावी लागेल., १ ऑक्टोबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२३ पर्यंतचे कर्ज : ५५ टक्के रक्कम भरून खाते बंद करता येईल., १ ऑक्टोबर २०२३ ते ३० सप्टेंबर २०२४ पर्यंतचे कर्ज : ७० टक्के रक्कम भरावी लागेल., १ ऑक्टोबर २०२४ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे कर्ज : ८५ टक्के रक्कम भरून कर्ज खाते निरंक करता येईल. झालेल्या खात्यांमध्ये कर्जाची थकबाकी, व्याज आणि बँकेसोबत झालेल्या तडजोडीच्या नियमांनुसार रक्कम निश्चित होते. त्यामुळे काही शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम कमी किंवा जास्त दिसू शकते. उदाहरणार्थ, एखाद्या शेतकऱ्याचे १ लाख रुपयांचे थकीत कर्ज असेल, तर योजनेतील संबंधित टक्केवारीची रक्कम भरून उर्वरित कर्जातून मुक्तता मिळू शकते. व्यावसायिक बँकांमधील खात्यांबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये यासाठी सहकार विभागाने स्पष्ट केले आहे की, ३१ मार्च २०२६ पर्यंतची थकीत कर्जरक्कम पोर्टलवर उपलब्ध

▶▶ पान २ वर

# 'विद्यार्थी मूर्ख आणि अंधभक्त' विधानावरून रणकंदन

## राहुल गांधींचा केंद्रावर हल्लाबोल



नवी दिल्ली । प्रतिनिधी

लोकसभेत परीक्षा सुधारणा विधेयकावर चर्चा सुरू असताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला. त्यांच्या भाषणातील काही वक्तव्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. प्रचंड गदारोळानंतर लोकसभेचे कामकाज दुपारी अडीच वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा संदर्भ देत म्हटले की, ''देशाच्या रस्त्यांवर उतरून भावी पिढीने जे काही केले, ते पाहून मला आनंद आणि दिलासा मिळाला. हा संताप, हिंसा किंवा द्वेष नव्हता, तर देशातील तरुणांच्या भावना व्यक्त करण्याचा मार्ग होता. सर्व राजकीय पक्षांनी या भावनांचा आदर केला पाहिजे.' यावेळी राहुल गांधी यांनी १८ वर्षीय विद्यार्थिनीसोबत झालेल्या संवादाचा उल्लेख केला. एका कार्यक्रमात त्या विद्यार्थिनीने विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचे वेगवेगळे प्रकार

▶▶ पान २ वर

# लोकसभेत गदारोळात परीक्षा सुधारणा विधेयक मंजूर

## पेपरफुटीवर कठोर कारवाईचा मार्ग मोकळा

नवी दिल्ली । प्रतिनिधी

देशभरात पेपरफुटीच्या घटनांमुळे निर्माण झालेल्या संतापाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आणलेले 'लोक परीक्षा (अनुचित साधनांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६' बुधवारी (दि. २९) लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. सलग दोन दिवस चाललेल्या प्रदीर्घ चर्चेनंतर आणि विरोधकांच्या गदारोळात हे विधेयक संमत झाले. विधेयक मंजूर होत असतानाही सभागृहात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार घोषणाबाजी सुरू होती. त्यानंतर लोकसभेचे कामकाज गुरुवारी सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले.



विधेयकावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे 'कॉकरोच जनता पार्टी' च्या आंदोलनादरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विद्यार्थ्यांवर बळप्रयोगाचे आदेश दिल्याचा गंभीर आरोप केला. या आरोपांनंतर सभागृहात मोठा गदारोळ झाला. सत्ताधारी सदस्यांनी राहुल गांधी यांच्या वक्तव्याला तीव्र विरोध करत माफीची मागणी केली. चर्चेदरम्यान वापरण्यात आलेल्या कथित असंसदीय शब्दांवरूनही दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक चकमक झाली. या विधेयकानुसार देशातील प्रत्येक राज्यात

▶▶ पान २ वर

# 'एनसीएमसी' स्मार्ट कार्डसाठी आता १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

मुंबई । प्रतिनिधी

**एसटी प्रवासात शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी 'एनसीएमसी' स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला आता १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप 'एनसीएमसी' स्मार्ट कार्ड प्राप्त झाले नसल्याने त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी हा निर्णय मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे.**

राज्य शासनाच्या वतीने अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, ज्येष्ठ नागरिकांना तसेच महिलांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देण्यात येते. या सवलती अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी १ ऑगस्टपासून 'एनसीएमसी' स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, राज्यातील अनेक पात्र प्रवाशांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असली तरी काही ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप प्रत्यक्ष कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे केवळ कार्ड उपलब्ध न झाल्याने पात्र प्रवाशांना शासनाच्या सवलतीपासून वंचित राहावे लागू नये,

▶▶ पान २ वर

# पाकव्याप्त काश्मीरमध्ये हिंसाचाराचा भडका

## ३० नागरिकांच्या मृत्यूचा दावा, पाकिस्तानी सैन्यावर गंभीर आरोप

इस्लामाबाद । वृत्तसंस्था

पाकिस्तानच्या बेकायदेशीर ताब्यातील काश्मीरमध्ये (पाकव्याप्त काश्मीर ) विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हिंसाचाराचा भडका उडाला असून, गेल्या ४८ तासांत किमान ३० नागरिकांचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या हिंसाचारासाठी पाकिस्तानी सैन्याला जबाबदार धरत 'जम्मू-काश्मीर संयुक्त अवामी अ‍ॅक्शन कमिटी' या संघटनेने गंभीर आरोप केले आहेत. या घटनांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरही तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून, मानवाधिकार संघटना ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने स्वतंत्र आणि



पारदर्शक चौकशीची मागणी केली आहे.

च्या माहितीनुसार, सोमवारी २५ तर मंगळवारी ५ नागरिकांचा मृत्यू झाला. निवडणुकांदरम्यान इंटरनेट सेवा बंद ठेवणे, लष्कराची मोठ्या प्रमाणावर तैनाती, आंदोलकांवर गोळीबार आणि मतदान प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचे आरोप करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक ठिकाणी नागरिक आणि सुरक्षा दलांमध्ये चकमकी झाल्याची माहिती समोर आली आहे. 'ॲम्नेस्टी साऊथ आशिया'च्या

▶▶ पान २ वर

# विद्यार्थी आंदोलक झाला तर तुरुंगात जावेच लागते

## जे.पी.नड्डांच्या वक्तव्यावरून राज्यसभेत गदारोळ

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात नीट पेपरफुटी प्रकरण आणि दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार वाद रंगला आहे. बुधवारी (दि. २९) राज्यसभेत सभागृह नेते आणि केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा तसेच विरोधी पक्षनेते व काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यात जोरदार खडाजंगी झाली.

खर्गे यांनी विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईचा निषेध करत केंद्र सरकारवर निशाणा साधला. तर नड्डा यांनी सरकारची बाजू मांडताना कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी केलेली कारवाई योग्य असल्याचे सांगितले. राज्यसभेतील चर्चेदरम्यान मल्लिकार्जुन खर्गे यांनी विद्यार्थ्यांच्या अटक प्रकरणावरून सरकारवर टीका केली. सीपीआय (एम) खासदार जॉन ब्रिटास यांनी एसएफआयच्या नेत्या आयशी घोष यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला होता.

▶▶ पान २ वर

# देशातील निम्म्याहून अधिक राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प रखडले

## महाराष्ट्रात सर्वाधिक ६० प्रकल्पांचा खोळंबा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

देशभरात सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांपैकी निम्म्याहून अधिक प्रकल्प नियोजित मुदतीत पूर्ण झाले नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने राज्यसभेत दिलेल्या लेखी उत्तरानुसार, देशातील सुरू असलेल्या १,१९१ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांपैकी ६२९ प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होऊ शकलेले नाहीत. विशेष म्हणजे, महाराष्ट्रात सर्वाधिक ६० महामार्ग प्रकल्प रखडले असून या बाबतीत राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे.

मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात सध्या ११७ राष्ट्रीय महामार्ग



प्रकल्पांचे काम सुरू असून त्यापैकी ६० प्रकल्पांची मुदत संपल्यानंतरही कामे अपूर्ण आहेत. त्यानंतर कर्नाटकात ७७ पैकी ४७, तर उत्तर प्रदेशात ८७ पैकी ४४ प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण झालेले नाहीत. महामार्ग प्रकल्पांना होणाऱ्या विलंबामागे अनेक कारणे असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. जमीन संपादनातील अडथळे, वन व पर्यावरण विभागाच्या

▶▶ पान २ वर

## राकेश टिकैत आणि सीजेपी नेत्यांची बैठक

# शेतकरी, विद्यार्थी आणि युवकांना एकत्र आणण्याची तयारी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

कॉकरोच जनता पार्टी सीजेपी आणि भारतीय किसान युनियन (बीकेयू)यांच्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. सीजेपीचे राष्ट्रीय प्रवक्ते आशुतोष रांका यांच्यासह पक्षाच्या काही नेत्यांनी दिल्ली येथे भारतीय किसान युनियनचे ज्येष्ठ नेते राकेश टिकैत यांची भेट घेतली. या बैठकीत शेतकरी, विद्यार्थी आणि जन-झेडअर्थात नव्या पिढीतील युवकांना एकत्र आणून आगामी आंदोलनाची दिशा ठरवण्याबाबत चर्चा झाल्याचे सांगण्यात आले.



बैठकीनंतर आशुतोष रांका यांनी सांगितले की, देशातील शेतकरी, विद्यार्थी आणि युवकांच्या प्रश्नांवर एकत्रितपणे आवाज उठवण्याची गरज आहे. शिक्षण, रोजगार, शेती आणि सामाजिक प्रश्नांवर संयुक्त लढा उभारण्यासाठी विविध घटकांना एका व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अलीकडेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर झालेल्या आंदोलनानंतर आता केवळ शिक्षण क्षेत्रापुरते मर्यादित न राहता शेतकरी आणि युवकांच्या प्रश्नांनाही आंदोलनाचा भाग बनवण्याच्या तयारीत असल्याचे दिसत आहे. व्यापक जनआंदोलन उभे करण्यासाठी शेतकरी संघटनांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. ने केंद्र सरकार आणि काही राज्य सरकारांवर आंदोलनादरम्यान दिलेली आश्वासने पूर्ण न केल्याचा आरोप केला आहे. विद्यार्थ्यांवरील दाखल गुन्हे अद्याप मागे घेण्यात आले नसल्याचा दावा पक्षाने केला आहे.

▶▶ पान २ वर

cmyk

cmyk



## अग्रलेख

# ‘उडान’ की उधळपट्टी? जबाबदार कोण, मोदी सरकार उत्तर देणार का?

देशभरात विमानतळ उभारण्याची स्पर्धा सुरू आहे. प्रत्येक राज्याला, प्रत्येक जिल्ह्याला विमानतळ हवा, अशी राजकीय चढाओढ सुरू आहे. मात्र प्रश्न असा आहे की, विमानतळ उभारणे हेच विकासाचे मोजमाप आहे का, की त्या विमानतळावरून प्रत्यक्षात विमाने उडतात हे अधिक महत्त्वाचे आहे?

खजुराहो विमानतळाला विमानतळ प्राधिकरणाच्या ग्राहक संतुष्टी सर्वेक्षणात सर्वोच्च स्थान मिळते; पण त्याच विमानतळावरून केवळ दोनच उड्डाणे होती आणि तीही आता बंद झाली आहेत. हा विरोधाभास केवळ हास्यास्पद नाही, तर सरकारच्या विमान वाहतूक धोरणातील अपयश उघड करणारा आहे. ज्या विमानतळावर प्रवासीच नाहीत, तेथे ग्राहक समाधानाचे प्रमाण इतके उच्च कसे? जर प्रवासी समाधानी होते, तर विमान कंपन्यांनी सेवा का बंद केली? हा प्रश्न केवळ विमानतळ प्रशासनालाच नव्हे, तर केंद्र सरकारलाही विचारला पाहिजे. मोदी सरकारने २०१६ मध्ये मोठ्या गाजावाजात ‘उडान’ योजना जाहीर केली. उद्दिष्ट होते लहान शहरांना हवाई सेवेशी जोडणे. पण आज दहा वर्षांनंतर वास्तव काय आहे? अनेक विमानतळांवर उड्डाणे बंद आहेत, अनेक ठिकाणी विमान कंपन्या सेवा चालवण्यास तयार नाहीत आणि उभारलेली पायाभूत सुविधा निष्प्रभ पडली आहे. मग हजारो कोटी रुपयांचा खर्च करून उभारलेले हे विमानतळ नेमके कोणासाठी? सरकारचा भर विमानतळ उद्घाटनांवर अधिक आणि त्यांची दीर्घकालीन व्यवहार्यता सुनिश्चित करण्यावर कमी दिसतो. विमानतळ उभारणे ही एक गोष्ट; पण तेथे पुरेसे प्रवासी, व्यावसायिक व्यवहार आणि विमान कंपन्यांसाठी आर्थिकदृष्ट्या टिकाऊ वातावरण निर्माण करणे ही सरकारची खरी जबाबदारी आहे. त्यातच सरकार अपयशी ठरले आहे. देशात शेकडो विमानतळांची घोषणा करण्यात आली, परंतु किती विमानतळांवर नियमित उड्डाणे सुरू आहेत? किती विमानतळ नफ्यात आहेत? किती विमानतळांवर सरकारला अनुदान द्यावे लागते? याची पारदर्शक माहिती देशासमोर का ठेवली जात नाही? ‘स्मार्ट सिटी’ योजनेप्रमाणेच ‘उडान’ही घोषणांच्या आकाशात झेपावली; पण जमिनीवर तिची पंखेच गळून पडल्याचे चित्र दिसते. उद्घाटनांचे राजकारण झाले, पण नियोजनाचे प्रशासन झाले नाही. यामध्ये खासगी विमान कंपन्यांनाही दोष देता येईल; मात्र त्याहून मोठी जबाबदारी सरकारची आहे. कारण व्यवहार्यतेचा अभ्यास न करता, बाजारपेठेची क्षमता न तपासता आणि दीर्घकालीन आर्थिक आराखडा न आखता विमानतळ उभारण्याचे निर्णय कोणी घेतले? करदात्यांच्या पैशातून उभारलेली ही पायाभूत सुविधा निष्क्रिय पडली, त्याची राजकीय आणि प्रशासकीय जबाबदारी कोण स्वीकारणार? ‘उडान’ योजनेअंतर्गत सुरू झालेल्या किती विमानतळांवर आज नियमित विमानसेवा सुरू आहे? हजारो कोटी रुपयांच्या सार्वजनिक गुंतवणुकीचा प्रत्यक्ष परतावा किती मिळाला? विमान कंपन्या सेवा बंद करत असताना सरकारचे नियोजन कुठे चुकले? केवळ उद्घाटनांचा विक्रम करणे हा विकास आहे का? करदात्यांच्या पैशातून उभारलेल्या निष्प्रभ विमानतळांची जबाबदारी कोण घेणार? खजुराहोसारख्या विमानतळाला ग्राहक समाधानात अव्वल स्थान मिळते, पण तेथे विमानेच नसतील तर त्या सर्वेक्षणाचे महत्त्व काय? विकासाचा अर्थ केवळ धावपट्टी बांधणे नसतो; त्या धावपट्टीवर विमाने उडणे आणि अर्थव्यवस्था गतिमान होणे हा असतो. अन्यथा विमानतळ उभे राहतील, फिती कापल्या जातील, पुरस्कारही मिळतील; पण धावपट्टीवर शांतता आणि करदात्यांच्या पैशावर धूळच साचत राहील. या अपयशाची राजकीय जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. कारण विमानतळ रिकामे असतील, तर घोषणांचे आकाश कितीही मोठे असले तरी विकासाला उड्डाण मिळत नाही.

# पेपरफुटीप्रकरणी काँग्रेस आक्रमक

## दोषींवर कठोर कारवाई आणि मंत्री दादा भुसे यांच्या राजीनाम्याची मागणी

**जालना प्रतिनिधी**

राज्यातील ड्रग इन्स्पेक्टर भरती परीक्षा आणि टीईटी पेपरफुटीच्या कथित प्रकरणांमुळे स्पर्धा परीक्षांची विश्वासार्हता धोक्यात आली असून लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ होत असल्याचा आरोप करत जालना शहर काँग्रेस कमिटीने बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत शासनाला निवेदन सादर केले. या प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करावी तसेच नैतिक जबाबदारी स्वीकारून संबंधित मंत्री दादा भुसे यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी काँग्रेसने केली.

शहर महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री व संबंधित विभागाकडे हे निवेदन पाठविण्यात आले. राज्यात वारंवार उघड होत असलेल्या पेपरफुटीच्या घटनांमुळे स्पर्धा परीक्षांसाठी वर्षानुवर्षे परिश्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा शासनावरील विश्वास डळमळीत झाला असून, पात्र उमेदवारांवर अन्याय होत असल्याची भावना तीव्र होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. काँग्रेसने म्हटले आहे की, बेरोजगार युवक-युवती मोठ्या आर्थिक खर्चासह मानसिक ताण सहन करून स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. मात्र पेपरफुटी, भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून अपात्र उमेदवारांना संधी मिळत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा देणे आवश्यक असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले. निवेदनात ड्रग इन्स्पेक्टर भरती परीक्षेतील कथित पेपरफुटीची उच्चस्तरीय चौकशी, टीईटीसह अन्य भरती परीक्षांतील दोषींवर कठोर फौजदारी कारवाई, गैरव्यवहारात सहभागी अधिकारी, कर्मचारी व दलालांवर गुन्हे दाखल करून निलंबन, भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित करणे, स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी स्वतंत्र सक्षम यंत्रणा स्थापन करणे आणि संबंधित मंत्री दादा भुसे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा देणे या प्रमुख मागण्या करण्यात आल्या. यावेळी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनाच्या शेवटी, स्पर्धा परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार सहन केला जाणार नाही. शासनाने तातडीने कठोर निर्णय घेऊन दोषींवर कारवाई करावी, अन्यथा राज्यभर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा काँग्रेसच्या वतीने देण्यात आला.

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची दुहेरी कार्यवाही व सज्ञा येथे दप्तर तपासणी

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जालना तालुक्यातील देवमुर्ती सज्जा येथे अचानक भेट देऊन तलाठी दप्तराची सखोल तपासणी केली. यावेळी त्यांनी महसुली अभिलेख, फेरफार नोंदी, ७/१२ उतारे, ई-अभिलेख, प्रलंबित प्रकरणे तसेच शासनाच्या विविध महसुली योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.**

तपासणीदरम्यान जिल्हाधिकारी यांनी अभिलेखांची बारकाईने पडताळणी करून दप्तर अद्ययावत ठेवणे, नागरिकांना वेळेत व पारदर्शक महसूल सेवा उपलब्ध करून देणे, ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर करणे तसेच शासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. त्यानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जालना जिल्ह्यातील सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांची व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये



महसूल विभागाच्या विविध प्राधान्याच्या विषयांचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या.बैठकीत विशेषतः मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण , कुणबी जातप्रमाणपत्र वाटपासाठीची कार्यपद्धती , ई-नोटीस, , ई-ऑफिस, स्वयंचलित हद्दवाचन केंद्रांची कार्यवाही, तक्रार निवारण पोर्टलवरील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, अंतर्गत शेतकरी ओळख पडताळणी, संदर्भातील प्रलंबित कामे तसेच महसूल अभिलेख अद्ययावतीकरण या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. संबंधित सर्व अधिकाऱ्यांना प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करून शासनाने निश्चित केलेल्या कालमर्यादेत कामकाज पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले. जिल्हाधिकारी यांनी महसूल प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक व नागरिकाभिमुख करण्यासाठी सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांनी नियमित क्षेत्रभेटी घेऊन अभिलेख अद्ययावत ठेवावेत, ऑनलाईन सेवांमधील प्रलंबित प्रकरणांचा त्वरित निपटारा करावा आणि नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे स्पष्ट निर्देश दिले.

# कर्जमाफीचा लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण तातडीने करा-प्रशासनाचे आवाहन

## १ लाख ७ हजार ५०५ पात्र शेतकरी; ७८ हजार २१५ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी

**जालना । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची प्रक्रिया सुरू केली असून, या लाभासाठी आधार प्रमाणीकरण अनिवार्य आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी कोणताही विलंब न करता जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांनी केले आहे.**

महाराष्ट्र शासनाने दि. २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या आणि दि. ३१ मार्च २०२६ अखेरपर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाची मुद्दल व व्याजासह जास्तीत जास्त दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी जालना जिल्ह्यातील सर्व बँकांनी एकूण २ लाख ३ हजार २८३ थकबाकीदार खातेदारांची माहिती महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली आहे. या माहितीच्या आधारे दि. २४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या लाभार्थी यादीमध्ये जिल्ह्यातील १ लाख ७ हजार ५०५ पात्र शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र, या पात्र लाभार्थ्यांपैकी दि. २९ जुलै २०२६ पर्यंत केवळ २९ हजार २९० शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण केली असून, अजूनही ७८ हजार २१५ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने शेतकरी कर्जमाफीच्या प्रक्रियेपासून वंचित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने आधार प्रमाणीकरण करून घेण्याचे आवाहन केले आहे. आधार प्रमाणीकरणासाठी शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आधार कार्ड व लाभार्थी यादीतील विशिष्ट क्रमांक सोबत न्यावा. केंद्रावर विशिष्ट क्रमांक अथवा आधार क्रमांक प्रविष्ट केल्यानंतर संबंधित शेतकऱ्याच्या कर्ज खात्याची माहिती आणि थकीत कर्जाची रक्कम दिसून येईल. सदर रक्कम मान्य असल्यास शेतकऱ्यांनी सहमती दर्शवून आधार प्रमाणीकरण करावे. जर रक्कमेबाबत शंका अथवा आक्षेप असल्यास असहमती नोंदवूनही आधार प्रमाणीकरण करता येणार आहे. शेतकऱ्यांनी असहमती नोंदवल्यानंतर संबंधित तक्रार ऑनलाईन पद्धतीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात येईल. त्यानंतर बँकेच्या अभिलेखांच्या आधारे तक्रारीची शहानिशा करून आवश्यक दुरुस्ती करण्यात येईल आणि सुधारित माहिती पुन्हा पोर्टलवर अपलोड केली जाईल. याशिवाय, आधार प्रमाणीकरणासाठी आपले सरकार सेवा केंद्र चालकास कोणत्याही प्रकारचे शुल्क देण्याची आवश्यकता नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे कोणत्याही अफवा किंवा संभ्रमाला बळी न पडता पात्र शेतकऱ्यांनी विनाशुल्क आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण केल्यास पात्र शेतकऱ्यांच्या थकीत कर्जमाफीची कार्यवाही पूर्ण होऊन त्यांना भविष्यात नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्गही सुकर होणार आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण करून शासनाच्या महत्त्वाकांक्षी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, श्री. विष्णू रोडगे यांनी केली आहे.

## पान १ वरून...

### शेतकरी कर्जमाफीसाठी

करून देण्यात आली आहे. त्यानंतरच्या व्याजाचा भार संबंधित बँकांनी उचलण्याची जबाबदारी घेतली आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांचे कर्ज पूर्णपणे माफ करण्याची प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे सहकार विभागाने सांगितले आहे. कर्जमाफी योजनेमुळे नियमित कर्जदारांसह झालेल्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळण्याची शक्यता असून, बँकांशी समन्वय साधून खाते निरंक करण्याचा मार्ग खुला झाला आहे.

-------------

### लोकसभेत गदारोळात परीक्षा

पेपरफुटीच्या गुन्ह्यांसाठी विशेष जलदगती न्यायालये (फास्ट ट्रॅक कोर्ट) स्थापन करण्यात येणार आहेत. अशा प्रकरणांचा तपास दोन महिन्यांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक राहणार आहे. पेपरफुटी करणाऱ्या व्यक्तींना १० वर्षांपर्यंत कारावास आणि ५० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे. तसेच संघटित स्वरूपात पेपरफुटी करणाऱ्या सिंडिकेटवर १० कोटी रुपयांपर्यंत दंड ठोठावण्याची तरतूदही या विधेयकात करण्यात आली आहे. दरम्यान, विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी राहुल गांधी यांचे सर्व आरोप फेटाळून लावले. आंदोलनादरम्यान कोणताही गोळीबार झालेला नसून केवळ अश्रुधुराचा वापर करण्यात आला होता, असे त्यांनी स्पष्ट केले. गोळीबाराचे आदेश देण्याचा अधिकार पोलिसांना नसून तो मॅजिस्ट्रेटकडे असतो, असेही त्यांनी नमूद केले. तसेच अमित शाह यांच्या ताफ्यात ३० वाहने असल्याचा दावा देखील त्यांनी तथ्यहीन असल्याचे सांगितले. लोकसभेत मंजुरी मिळाल्यानंतर हे विधेयक आता राज्यसभेकडे पाठविण्यात येणार आहे. राज्यसभेची मंजुरी आणि त्यानंतर राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर हा कायदा देशभर लागू होणार आहे. पेपरफुटीविरोधात कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने हे विधेयक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

-----------

### ‘विद्यार्थी मूर्ख आणि अंधभक्त’

सांगितल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले. यामध्ये सत्य स्वीकारणारा विद्यार्थी, स्वतःची मोठी प्रतिमा निर्माण करणारा विद्यार्थी आणि कोणत्याही व्यक्तीला डोळे झाकून समर्थन देणारा ’अंधभक्त’ असा उल्लेख करण्यात आला. या विधानावरून सभागृहात जोरदार गदारोळ झाला. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी राहुल गांधींच्या वक्तव्यावर आक्षेप घेतला. ते म्हणाले, ‘‘राहुल गांधी यांनी असंसदीय शब्दांचा वापर केला आहे. विद्यार्थिनीच्या नावाखाली ते स्वतःचे विचार मांडत आहेत. असे शब्द सभागृहाच्या कामकाजातून हटवले पाहिजेत.‘‘ राहुल गांधी यांनी दिल्लीतील नीट विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस कारवाईवरून केंद्र सरकारवर आरोप केले. त्यांनी या कारवाईमागे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा आदेश असल्याचा दावा केला. या आरोपावर सत्ताधारी सदस्यांनी तीव्र आक्षेप घेत राहुल गांधींनी आरोप मागे घेण्याची मागणी केली. रिजिजू यांनी राहुल गांधींकडे आरोपांचे पुरावे मागितले. ‘‘कोणावरही गंभीर आरोप करताना पुरावे आवश्यक आहेत. राहुल गांधी यांनी पुरावे द्यावेत. अन्यथा अशा प्रकारची वक्तव्ये सभागृहात करता येणार नाहीत,‘‘ असे ते म्हणाले. दरम्यान, सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये घोषणाबाजी सुरू झाल्याने लोकसभेत वातावरण तापले. अखेर सभापतींनी हस्तक्षेप करत सभागृहाचे कामकाज दुपारी अडीच वाजेपर्यंत तहकूब केले.

-----------

### विद्यार्थी आंदोलक झाला

यावरून खर्गे यांनी लोकशाहीच्या स्थितीवर प्रश्न उपस्थित केले. ‘‘राष्ट्रीय पक्षाच्या कार्यालयात घुसून कोणाला अटक करण्याची भाषा केली जात असेल, तर ही लोकशाही धोक्यात आल्याचे लक्षण आहे,‘‘ असे खर्गे म्हणाले. तसेच अशा प्रकारची कारवाई करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. खर्गे यांच्या आरोपांना उत्तर देताना केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी आंदोलनाच्या अधिकारासोबत कायद्याचे पालन करण्याची गरज असल्याचे सांगितले. ‘‘मी स्वतः विद्यार्थी असताना अनेक आंदोलनांमध्ये सहभागी झालो आहे. त्यावेळी मलाही अनेकदा अटक झाली होती. आंदोलक झाला तर तुरुंगात जावेच लागते,‘‘ असे नड्डा म्हणाले. विद्यार्थ्यांना सक्रिय राजकारण किंवा आंदोलन करायचे असेल, तर त्यांना अशा प्रकारच्या कारवाईला सामोरे जाण्यास तयार राहावे लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. नड्डांच्या या वक्तव्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार आक्षेप घेतला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सरकार संवेदनशील नसल्याचा आरोप विरोधकांनी केला. तर सरकारने कायदा-सुव्यवस्थेच्या नावाखाली विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केल्याचेही विरोधकांनी म्हटले. नीट पेपरफुटी, विद्यार्थी आंदोलन आणि पोलिस कारवाईचे मुद्दे आगामी काळातही संसदेत तापण्याची शक्यता आहे.

-------------

### पाकव्याप्त काश्मीरमध्ये

कार्यवाहक संचालक इसाबेल लॅसी यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आंदोलकांवर सुरक्षा दलांकडून करण्यात आलेला बळाचा वापर अत्यंत चिंताजनक आहे. या घटनांची तातडीने निष्पक्ष, स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशी करण्यात यावी. इंटरनेट आणि मोबाईल सेवा बंद असल्यामुळे प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती बाहेर येण्यास अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे पाकिस्तान सरकारने तातडीने सर्व दळणवळण सेवा सुरू करून प्रसारमाध्यमे आणि स्वतंत्र निरीक्षकांना या भागात प्रवेश द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. पाकिस्तानी प्रशासनाने ५ जूनपासून या भागातील इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद ठेवल्याचा आरोप आहे. अधिक स्वायत्ततेच्या मागणीसाठी च्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनावर गेल्या अनेक आठवड्यांपासून कठोर कारवाई करण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे. या आंदोलनात आतापर्यंत किमान ४० जणांचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला असून, त्यामध्ये ३४ आंदोलक आणि ६ सुरक्षा कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याचे म्हटले जाते. परिस्थिती चिघळल्यानंतर पाकिस्तान प्रशासनाने वर दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत बंदी घातली आहे. चे आंदोलन सुरुवातीला पाकव्याप्त काश्मीरच्या विधानसभेत जम्मू-काश्मीरमधील निर्वासितांसाठी राखीव असलेल्या १२ जागा रद्द करण्याच्या मागणीसाठी सुरू झाले होते. मात्र, कालांतराने या आंदोलनाचे रूपांतर पाकिस्तानच्या राजवटीविरोधातील व्यापक आंदोलनात झाले. आंदोलकांनी इस्लामाबादच्या नियंत्रणाला विरोध करत या भागात अधिक स्वायत्ततेची मागणी केली आहे. तसेच पाकिस्तानी सैन्य या प्रदेशाला दहशतवादाकडे ढकलत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. वृत्तसंस्था च्या माहितीनुसार, चे सदस्य इम्तियाज अस्लम यांनी सांगितले की, पाकिस्तानी सैन्याच्या कारवाईत आंदोलनाचे संस्थापक उमर नझीर काश्मीरी यांचे धाकटे बंधू उस्मान नझीर यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर इंग्लंडमधील ब्रॅडफर्ड येथे पाकिस्तानी दूतावासाबाहेर काश्मिरी प्रवासी आणि समर्थकांनी निदर्शने करत पाकिस्तानविरोधात घोषणाबाजी केली. च्या दाव्यानुसार, जून महिन्याच्या सुरुवातीपासून आतापर्यंत पाकिस्तानी सैन्याच्या कारवाईत किमान ६७ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला आहे. २७ जुलै रोजी पार पडलेल्या पहिल्या टप्प्यातील मतदानादरम्यान मीरपूरसह अनेक भागांत हिंसाचार उसळल्याची माहिती आहे. प्राथमिक निकालांनुसार मीरपूरमध्ये पाकिस्तान मुस्लिम लीग (नवाज) आघाडीवर असून, पाकिस्तान पीपल्स पार्टी दुसऱ्या क्रमांकावर आहे. माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ पक्षाने निवडणुकीवर बहिष्कार टाकला आहे. तसेच च्या सदस्यांना अपक्ष म्हणूनही निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. चे प्रवक्ते एस. ए. खान यांनी आरोप केला की, मीरपूरमध्ये निशस्त्र आंदोलकांवर गोळीबार करण्यात आला आणि पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह हटविण्यात आले. त्यांच्या मते, सुरक्षा दलांनी रुग्णालयांवरही नियंत्रण मिळवून पुरावे लपविण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे, पाकिस्तानचे माहिती व प्रसारण मंत्री अताउल्ला तरार यांनी हे आंदोलन ‘‘भारत पुरस्कृत‘‘ असल्याचा आरोप केला आहे. संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनीही आंदोलकांवर टीका करत त्यांना ‘‘भारतासारख्या शत्रूंच्या प्रभावाखालील‘‘ असे संबोधले. मात्र, ने हे आरोप फेटाळून लावत पाकिस्तानकडून नागरिकांवर अत्याचार होत असल्याचा पुनरुच्चार केला आहे. या प्रकरणात मृतांचा आकडा, गोळीबार, इंटरनेट बंदी आणि इतर गंभीर आरोपांबाबत विविध दावे , मानवाधिकार संघटना आणि इतर स्रोतांकडून करण्यात आले आहेत. पाकिस्तान सरकारने अनेक आरोप फेटाळले असून, सर्व दाव्यांची स्वतंत्र आणि निष्पक्ष पडताळणी अद्याप झालेली नाही.

------------

### ‘एनसीएमसी’ स्मार्ट कार्डसाठी

याची दखल प्रताप सरनाईक यांनी घेतली आहे. प्रताप सरनाईक म्हणाले, एसटीची प्रवासी सवलत ही सर्वसामान्यांच्या सोयीसाठी आहे. तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक कारणामुळे कोणत्याही पात्र ज्येष्ठ नागरिक अथवा महिला प्रवाशाची गैरसोय होऊ नये, ही आमची भूमिका आहे. त्यामुळे ‘एनसीएमसी’ स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या अंमलबजावणीला १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे, असे सरनाईक यांनी सांगितले. या मुदतवाढीमुळे ‘एनसीएमसी’ स्मार्ट कार्ड अद्याप प्राप्त न झालेल्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. दरम्यान, पात्र प्रवाशांनी या वाढीव मुदतीचा उपयोग करून एनसीएमसी स्मार्ट कार्डची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहनही सरनाईक यांनी केले आहे.

------------

### शेतकरी, विद्यार्थी आणि युवकांना

काही राज्यांमध्ये विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला असला तरी राजस्थानसह काही ठिकाणी प्रकरणे कायम असल्याचे चे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी ने राकेश टिकैत यांच्याकडे सहकार्य मागितले आहे. विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेतले नाहीत आणि मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर शेतकरी संघटना व युवकांच्या सहकार्याने देशव्यापी आंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे. जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनाच्या काळात राकेश टिकैत यांनी आंदोलनस्थळी भेट देत विद्यार्थ्यांना पाठिंबा दिला होता. त्यामुळे आणि बीकेयू मधील ही बैठक आगामी काळातील आंदोलनाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. दरम्यान, भारतीय किसान युनियनच्या टिकैत गटाने राजस्थानातील अलवर जिल्ह्यातील सरिस्का परिसरातील १८६ गावांतील शेतकऱ्यांची ३० जुलै रोजी महापंचायत आयोजित केली आहे. या बैठकीत शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर चर्चा होणार आहे. चे आशुतोष रांका यांनी सरकारने आंदोलनादरम्यान झालेल्या चर्चेची लेखी प्रत द्यावी, विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घ्यावेत आणि भविष्यात अशा प्रकारे गुन्हे दाखल होणार नाहीत याची हमी द्यावी, अशी मागणी केली आहे. या मागण्या पूर्ण न झाल्यास शेतकरी, विद्यार्थी आणि युवकांना सोबत घेऊन पुन्हा मोठे आंदोलन उभारले जाईल, असा इशारा कडून देण्यात आला आहे.

------------

### देशातील निम्म्याहून अधिक

परवानग्यांमध्ये होणारा विलंब, स्थानिक पातळीवरील वाद, तसेच कंत्राटदारांच्या आर्थिक अडचणी यामुळे अनेक प्रकल्पांची गती मंदावली आहे. सरकारने स्पष्ट केले की, ही आकडेवारी केवळ सध्या बांधकाम सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांची आहे. ज्या प्रकल्पांचे कंत्राट रद्द झाले आहे किंवा ज्या प्रकल्पांचे काम पूर्णपणे बंद करण्यात आले आहे, त्यांचा या आकडेवारीत समावेश करण्यात आलेला नाही. दुसरीकडे, दिल्ली, चंदीगड, दादरा आणि नगर हवेली तसेच पुदुच्चेरी या केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकही राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प रखडलेला नसल्याची नोंद आहे. राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांमध्ये होत असलेल्या विलंबामुळे वाहतूक कोंडी, प्रवाशांचा वाढता प्रवासकाल, तसेच प्रकल्पांच्या खर्चात मोठी वाढ होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्यासाठी आवश्यक परवानग्या वेळेत मिळाव्यात, जमीन संपादनाची प्रक्रिया जलद व्हावी आणि कंत्राटदारांना आवश्यक सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ३० जुलै २०२६


## थोडक्यात

### राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत शाश्वती शरद जावळे ची चमकदार कामगिरी

माजलगाव । प्रतिनिधी

सनराईज एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित इन्स्पायर अबॅकस अकॅडमीच्या वतीने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा रविवार, दिनांक २६ रोजी अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले असता माजलगाव येथील कु. शाश्वती शरद जावळे हिने या



राष्ट्रीय स्पर्धेत पाचवा क्रमांक पटकावत चॅम्पियन ट्रॉफी मिळवून माजलगावच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे.

राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत राज्यभरातून हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. इन्स्पायर अबॅकस क्लासेस बीड येथील विद्यार्थ्यांनी अवघ्या पाच मिनिटांत बोटांवर आकडेमोड करून १०० हून अधिक गणिते सोडविण्याची कौशल्यपूर्ण कामगिरी केली. त्यांच्या या असामान्य वेगाने व अचूकतेने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते चॅम्पियन ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. शाश्वती जावळे हिच्या या यशामागे बेस्ट टीचर अवॉर्ड प्राप्त अबॅकस शिक्षिका शिला जावळे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थी ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने अबॅकसचे प्रशिक्षण घेत आहेत.राष्ट्रीय स्पर्धेत पाचवा क्रमांक पटकावत चॅम्पियन ट्रॉफी मिळविल्याबद्दल महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाच्या वतीने शाश्वती जावळे हिचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.शाश्वतीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षण क्षेत्रासह विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिच्या यशामुळे माजलगावच्या शैक्षणिक क्षेत्राची मान उंचावली आहे.



### अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचा दणदणीत विजय

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या निवडणुका अंबाजोगाईत नुकत्याच घेण्यात आल्या. या निवडणुकीमध्ये परिवर्तन पॅनलच्या नवख्या उमेदवारांनी बहुमताने विजय प्राप्त करीत विजयाचा चौकार मारला. या निवडणुकीनंतर झालेल्या अंबाजोगाई मेडीकल प्रॅक्टीशनर्स असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारिणीची दोन वर्षे कालावधीसाठी निवड करण्यात आली. यावेळी सर्वानुमते कार्यकारिणी निवडण्यात आली. या नूतन कार्यकारणी मध्ये पदाधिकारी म्हणून अध्यक्षपदी डॉ.निशिकांत पाचेगावकर, उपाध्यक्षपदी डॉ.प्रिया मुळे, सचिवपदी डॉ.संदीप जोगदंड, सहसचिवपदी डॉ.नजीर, अस्लम खान, डॉ.इम्रान पटेल तसेच कोषाध्यक्षपदी डॉ.स्वाती हारे, क्रीडा सचिवपदी डॉ.वेणुगोपाल आगळे, डॉ.पूजा लोमटे, सांस्कृतिक समिती सचिवपदी डॉ.सचिन कस्तुरे, डॉ.स्नेहल पेस्टे, कार्यकारिणी सदस्य म्हणून डॉ.शिवाजी मस्के, डॉ.प्रवीण जोशी यांची निवड करण्यात आली. निवडणुका झाल्यानंतर परिवर्तन पॅनलच्या वतीने डॉ.राजेश इंगोले, डॉ.प्रशांत पाटील, डॉ.अतुल देशपांडे, डॉ.सुलभा पाटील, डॉ.प्रल्हाद गुरव, डॉ इम्रान अली, डॉ.प्रदीप सोनवणे, डॉ.योगेश मुळे, डॉ.संदीप जैन, डॉ.देवराव चामणर, डॉ.बाळासाहेब हाके, डॉ.सुमित केंद्रे, डॉ.सुनील नांदलगावकर, डॉ.बळीराम मुंडे, डॉ.विजय लाड या पॅनलच्या प्रवर्तकांनी सर्व मतदारांचे आभार मानले आणि निवडून आलेल्या सर्व उमेदवारांचे शाल, श्रीफळ देवून फेटा बांधून आणि गुलाल उधळून सत्कार केला.

# बालेपीरजवळ रखडलेला रस्ता अखेर वाहतुकीसाठी खुला

## भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याला यश; दुतर्फा वाहतूक सुरळीत

बीड । प्रतिनिधी

शहरातील अहिल्यानगर-बीड राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ वरील बालेपीर परिसरात अनेक दिवसांपासून रखडलेला रस्ता अखेर वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे हे काम पूर्णत्वास गेले असून, बुधवारी (दि.२९) त्यांनी रस्त्यावरील बॅरीकेट हटवून रस्ता नागरिकांसाठी सेवेत खुला केला. त्यामुळे आता दुतर्फा वाहतूक सुरळीत झाली आहे. यावेळी नगरसेवक सय्यद मुस्तफा, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे उपअभियंता राजेंद्र भोपळे, राजाभाऊ गुजर, अ‍ॅड.नागेश तांबारे आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

शहरातील बालेपीर परिसरात रस्ता व नालीचे काम रखडल्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. रस्त्याचे काम अपूर्ण असल्याने वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका आणि वस्त्यांतील नागरिकांची गैरसोय वाढली होती. या प्रश्नाची दखल घेत भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, युवा नेते डॉ.योगेश



क्षीरसागर, ड.सर्जेराव तांदळे यांच्यासह शिष्टमंडळाने यापूर्वी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. रखडलेली रस्ता व नालीची कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी करत, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता. त्यानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर संबंधित यंत्रणेने रस्त्याचे काम पूर्ण केले. दरम्यान, डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी हा रस्ता नागरिकांसाठी खुला केला आहे. दोन्ही बाजूने वाहतूक सुरु झाल्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला असून स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त करत डॉ.क्षीरसागर यांचे आभार मानले. यावेळी डॉ.रमेश शिंदे, विठ्ठल गुजर, अनिकेत सानप यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बीडकरांचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही कटीबद्ध -डॉ.क्षीरसागर**

नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न सोडविणे हेच आमचे प्राधान्य आहे. जनतेच्या हितासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक विकासकामाचा सातत्याने पाठपुरावा करून ती पूर्णत्वास नेण्याचा आमचा प्रयत्न राहील. बीडकरांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

## कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते विनोद नरसाळे यांचा 'राज्यस्तरीय आदर्श पत्रकार' पुरस्काराने गौरव

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील कोळगावचे भूमिपुत्र तथा गेवराई तालुका दक्ष पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद नरसाळे यांचा राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा कॅबिनेट मंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते 'राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. महानायक वसंतरावजी नाईक जयंती उत्सव समिती आणि बीड जिल्हा बंजारा समाजाच्या वतीने गेवराई येथील गजानन लॉन्स, कोल्हेर रोड येथे आयोजित भव्य बंजारा जागृती मेळाव्यात हा प्रतिष्ठेचा पुरस्कार पत्रकार विनोद नरसाळे यांना प्रदान करण्यात आला.

या भव्य सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी पोहरादेवीचे महंत जितेंद्र महाराज होते. व्यासपीठावर ज्येष्ठ विचारवंत तथा लेखक प्रा. फुलसिंग जाधव, भाजपचे ज्येष्ठ नेते बाळराजे दादा पवार, युवा नेते



यशराजभैय्या पंडित, प्रसिद्ध वक्ते संजयभाऊ चव्हाण (सोलापूर), राष्ट्रीय बंजारा महासंघाचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष तथा वसंतराव नाईक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. पी. टी. चव्हाण, उत्तमभाऊ चव्हाण, अण्णासाहेब राठोड, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. दरम्यान विनोद नरसाळे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण व शहरी भागातील जनतेच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडत लोकाभिमुख पत्रकारितेची परंपरा जपली आहे. प्रशासनातील त्रुटी, सामाजिक प्रश्न, विकासकामे, शिक्षण, आरोग्य, शेती, पाणीटंचाई तसेच सर्वसामान्यांच्या दैनंदिन समस्यांवर त्यांनी सातत्याने अभ्यासपूर्ण आणि निर्भीड वृत्तांकन केले आहे.शोध पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक महत्त्वाचे विषय उजेडात आणत संबंधित यंत्रणांना दखल घेण्यास भाग पाडण्यातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांची पत्रकारितेतील निष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि जनहिताच्या भूमिकेची दखल घेत त्यांना यापूर्वीही जिल्हा व मराठवाडा स्तरावरील विविध प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त झाले असून याच समाजाभिमुख पत्रकारितेची दखल घेऊन त्यांना महानायक वसंतरावजी नाईक जयंती उत्सव समिती व बीड जिल्हा बंजारा समाजाच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार' जाहीर करण्यात आला होता. रविवार दि.२६ रोजी भव्य आयोजित कार्यक्रमात कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांच्यासह व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांकडून त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानानंतर पत्रकार, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी विनोद नरसाळे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील पत्रकारितेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जनतेच्या प्रश्नांवर निर्भीडपणे आवाज उठविणाऱ्या पत्रकारितेचा हा सन्मान असल्याची भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली.

## गुरुपौर्णिमेनिमित्त जिजामाता महाविद्यालयामध्ये गुरुंचा सन्मान

माजलगाव । प्रतिनिधी

आषाढी पौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करत जिजामाता फिजिओथेरपी कॉलेज, माजलगाव येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु... या श्लोकाचे सामूहिक पठण करून वातावरण भक्तिमय केले.यावेळी विद्यार्थ्यांनी विविध भाषणे सादर करून गुरुंचे जीवनातील महत्त्व अधोरेखित केले.तसेच सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.कार्यक्रमाला कॉलेजचे प्राचार्य डॉ.पॉल राज, उपप्राचार्य डॉ.सिमुलिया डिन्जू,डॉ.हरि प्रिया,डॉ. सुमित,डॉ. सिकंदर,डॉ.वीरा, कार्यालयीन अधीक्षक वाघ सर इरफान पठाण तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने





उपस्थित होते.प्राचार्य डॉ. पॉल राज यांनी विद्यार्थ्यांना गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व सांगत आयुष्यात शिस्त, सेवाभाव आणि समर्पण या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.

तसेच इरफान पठाण यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की,आई-वडिलांनंतर गुरूंचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. तुम्ही भविष्यातील डॉक्टर आहात. भविष्यात तुम्ही कॉलेजचे नाव उज्ज्वल कराल. गुरूकडून मिळणाऱ्या ज्ञानाचा योग्य उपयोग करून समाजसेवेचे कार्य करा.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुनम मुंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यार्थी दिग्विजय सोळंके,गणेश कुंभार,भावेश चेऊलकर,रोहित डोंगापुरे,सचिन गव्हाणे आणि ओमकार गोल्हार यांनी विशेष परिश्रम घेतले.समाजाला गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देणारे सक्षम फिजिओथेरपिस्ट घडविण्याचा संकल्प कायम ठेवत गुरुंच्या आशीर्वादाने यापुढील वाटचाल करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## गुरुपौर्णिमा म्हणजे विद्यार्थ्यांच्या जडण घडणीचा पवित्र दिवस - आदिनाथ कुंडकर

माजलगाव । प्रतिनिधी

गुरुपौर्णिमा म्हणजे विद्यार्थ्यांच्या जडणघडणी मधील पवित्र दिवस आहे.ज्यातून गुरू शिष्याचे नाते विकसित करण्याचा हा उत्सव आहे.असे प्रतिपादन प्रसिद्ध कीर्तनकार तथा सहशिक्षक आदिनाथ कुंडकर यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या वेळी व्यासपीठावर अध्यक्ष अभय कोकड (अध्यक्ष श्री सिद्धेश्वर महाविद्यालय विकास समिती ), प्रमुख पाहुणे उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना तसेच प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे,पर्यवेक्षक प्रा.परमेश्वर खेत्री यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.





पुढे बोलतांना प्रमुख पाहुणे आदिनाथ कुंडकर म्हणाले की, गुरू ही संकल्पना व्यापक आहे. आजचा दिवस व्यास पौर्णिमा म्हणूनही साजरा केला जातो. महर्षी व्यास यांनी राष्ट्रनिर्मितीसाठी प्रचंड त्याग करून महाभारत हे महाकाव्य रचले. विद्यार्थ्यांनीही असेच वेळेचे योग्य दान केले तर आयुष्य घडून विद्या प्राप्त होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा परमेश्वर खेत्री यांनी करतांना गुरुपौर्णिमेचे भारतीय संस्कृतीतील महत्व विशद केले. विश्व गुरू तव अर्चना मे' वैयक्तिक पद्य प्रा. अंकुश साबळे यांनी सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. अध्यक्षीय समारोप करतांना महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख अभय कोकड म्हणाले की, विद्यार्थ्यांनी गुरूपौर्णिमेनिमित्त आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शन घेण्याचा संकल्प करावा आणि भारताला महासत्ता बनवण्यासाठी शिक्षणाचा पाया मजबूत करावा. या कार्यक्रमाचे आभार व शांतीमंत्र प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी सादर केले. तसेच सूत्रसंचालन प्रा राघवेंद्र मुळी यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी, विद्यार्थिनी प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## रोटरी क्लब बीड व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाथापूर यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम

नाथापूर । प्रतिनिधी

रोटरी क्लब बीड व जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नाथापूर तालुका बीड यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेमध्ये सोमवारी दि. २७ जुलै ला एक पेड माँ के नाम या मोहिमे अंतर्गत विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण व संगोपन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला .

याबाबत अधिक माहिती अशी की रोटरी क्लब बीडचे २०२६-२७ चे अध्यक्ष रो.सि.ए.श्रीगोपाल लड्डा, सचिव रो सुहास बेद्रे, आय. पी. पी. रो. विकास उमापूरकर प्रोजेक्ट चेअरमनरो.विवेक बडगे आणि रो. प्रा. अभय पटवारी यांच्या संकल्पनेतून एक पेड माँ के नाम या शीर्षकांतर्गत वृक्षारोपण व संगोपन या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नाथापूर शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक गोविंदजी सारडा सर यांनी केले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाथ कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद चव्हाण सर तर प्रमुख पाहुणे म्हणू उपसरपंच



सतीश बापू शिंदे उपस्थित होते.प्रथम मान्यवरांचे स्वागत शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक गोविंद सारडा सर व त्यांचे सहकारी प्रमोद कुलकर्णी सर यांनी केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या हस्ते शाळेमध्ये आईच्या नावाने एक झाड लावण्यात आले. रोटरी क्लब च्या वतीने जातीवंत केशर आंबा आणि चिकू ची दर्जेदार झाडे देण्यात आली.

यावेळी उपस्थित पालकांना आणि विद्यार्थ्यांना संबोधित करताना रो.विकास उमापुरकर म्हणाले की वृक्ष एवढे दिलदार महत्त्वाचे आहेत की ते कायम आपल्याला देणगीच देत राहतात, मग ती देणगी अथवा दान फळांच असो की सावलीचं. असे वक्तव्य करून पुढे रो. विकास म्हणाले की झाडं वाचली तर आपल्याला प्राणवायू मिळेल आणि प्राणवायू मिळाला तरच आपण जिवंत राहू शकू याप्रसंगी प्रोजेक्ट चेअरमन या नात्याने विद्यार्थ्यांना संबोधित करताना रो. प्रा अभय पटवारी यांनी, वृक्षवल्ली आम्हा सोयरी या संत वचनाचा संदर्भ देत माणसाचे सर्वोत्तम आणि विश्वास-पात्र मित्र म्हणजे वृक्ष होत. असे सांगितले पुढे बोलताना रो.अभय सर असे म्हणाले की वृक्षांना जपणं म्हणजे येणाऱ्या कित्येक पिढ्यांना जपणं होय. मागील काळामध्ये बेसुमार वृक्षतोड करून आपण पर्यावरणाची प्रचंड हानी घडवून आणली आहे त्याची भरपाई करायची असेल तर प्रत्येक विद्यार्थ्याने एक तरी झाड लावले पाहिजे आणि लावलेले झाड टिकवले पाहिजे. मराठी माध्यमाच्या शाळांची गरज आणि महत्त्व पालकांना पटवून देताना रो. अभय सर म्हणाले की मातृभाषेतून शिक्षण देणे म्हणजे आपल्या पाल्याला भावी शैक्षणिक प्रवासाला सर्वार्थानं सज्ज करणे होय. जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळा टिकल्या पाहिजेत यासाठी पालकांनी आपण ज्या पद्धतीच्या शाळेत शिकलो त्याच आदर्श मराठी माध्यमाच्या शाळांमधून आपल्या पाल्यांना प्राथमिक शिक्षणाचे धडे द्यावेत तेच उपयुक्त ठरणार आहे हे त्यांनी सौदाहरण सांगितले.

प्राचार्य गोविंदाम चव्हाण सर यांनी वृक्षारोपण व त्याचे संगोपन याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मी या शाळेचा विद्यार्थी आहे त्यामुळे शाळेसाठी काहीतरी देणे लागतो या हेतूने त्यांनी शाळेला ११००० रुपये देणगी जाहीर केली. यावेळी शाळेतील चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेला विद्यार्थी ची.राजवीर नवनाथ चव्हाण आणि आयुष अमोल पटवारी याचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. शाळेला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी रोटरी क्लबच्या वतीने देण्यात आले.

कार्यक्रमाचे नियोजन रोहिणी बाभूळगावकर मॅडम व प्रतिभा कुलकर्णी मॅडम यांनी यशस्वीरित्या केले. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### माझे बाबाच माझे गुरु

आयुष्यभर खूप काही शिकवले. आजही त्यांच्या प्रत्येक कृतीतून मला प्रेरणा आणि शिकवण मिळते. त्यामुळे त्यांच्या चरणी मी नतमस्तक आहे. याच भावनेतून आपण अधिक मेहनत करून, अधिक लोकसेवा करत लोक कल्याणासाठी समर्पित जीवन जगण्याचा संकल्प केला असल्याचे त्यांनी नमूद केले. आजच्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रत्येकाने एक चांगला संकल्प करावा आणि आपल्या गुरूंना अभिमान वाटेल असे कार्य करून त्यांच्या संस्कारांचे ऋण फेडावे असे आवाहनही त्यांनी केले.

### लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे

आनंद पाहून हा सामाजिक उपक्रम यशस्वी झाल्याची भावना व्यक्त करत अशोक रसाळ म्हणाले की, पंकजाताई मुंडे यांच्या प्रेरणेतून समाजातील गरजू, वंचित आणि सर्वसामान्य घटकांसाठी सातत्याने कार्य करण्याची ऊर्जा आम्हाला मिळते. आमच्या सारख्या सामान्य कार्यकर्त्यांना माणसात आणणाऱ्या या लोकनेत्यांना आई जगदंबेने उदंड, निरोगी आणि दीर्घायुष्य द्यावे, हीच प्रार्थना. या सामाजिक उपक्रमाचे परिसरातील नागरिकांनी स्वागत करून आयोजकांचे कौतुक केले.

### पात्रुड लूऊळ रस्त्याची

पावसाळ्यामध्ये या खड्ड्यामध्ये पाणी साठल्याने प्रवाशांना वाट शोधत पाण्यातून तारेवरची कसरत करत जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. या ठिकाणी अनेक मोटार सायकल स्वारांची गाडी स्लिप होऊन व खड्ड्यामध्ये जाऊन त्यांचे अपघात झाले आहेत. परंतु आमदार, खासदार यांना या रस्त्याकडे बघण्यास अजिबात वेळ नाही असेच दिसून येत आहे.

निवडणूक काळामध्ये फक्त आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी नागरिकांच्या दारोदारी फिरतात निवडणूक झाल्यानंतर हेच लोकप्रतिनिधी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी लक्ष घालत नाहीत. तरी या रस्ता दुरुस्तीसाठी पात्रुड येथील सुज्ञ नागरिकांनी मनसबदार आहे गार्डन मंगल कार्यालयासमोरील खड्डा दुरुस्ती करून वाहतूक सुरळीत करण्यात यावी व पुढील होणारे अपघात टाळावेत असे . प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी याची दखल न घेतल्यास भविष्यात मोठे आंदोलन छेडले जाईल असाही इशारा गाव कऱ्यानी केला आहे.

### ३ ऑगस्ट रोजी जिल्हा

निर्माण झालेला गोंधळ दूर करावा. कोण पात्र, कोण अपात्र, पुढील प्रक्रिया काय, याची स्पष्ट व पारदर्शक माहिती द्यावी. जर बँका, सहकार खाते आणि सरकारने शेतकऱ्यांना योग्य सहकार्य केले नाही, तर येत्या ३ ऑगस्ट रोजी जिल्हा सहकारी निबंधक (ऊ‌ऊ) कार्यालय आणि लीड बँक कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल. शेतकऱ्यांचा संयम संपत चालला आहे. न्याय मिळाला नाही, तर आंदोलन ९ ऑगस्ट रोजी आणखी तीव्र करण्यात येईल.

### गंभीर गुन्ह्यात अ‍ॅड.तेजस

प्रभावी युक्तिवादाची दखल घेत मा.न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग, आष्टी यांनी तिन्ही आरोपींना डिफॉल्ट जामीन मंजूर केला. कायद्याचा सखोल अभ्यास, अचूक न्यायालयीन मांडणी आणि आरोपीस कायद्याने दिलेला हक्क मिळवून देण्याच्या कायद्याच्या ज्ञानामुळे ड. तेजस सुभाष नेहरकर ,बीड यांचे विधी क्षेत्रात कौतुक होत असून, त्यांच्या अभ्यासू व परिणामकारक वकिलीची ही आणखी एक उल्लेखनीय नोंद ठरली आहे. आरोपीच्या वतीने कामकाज पाहताना एडवोकेट तेजस नेहरकर यांना ड. अविनाश पं. गंडले,ड. गौतम के नाईकवाडे, ड.इमरान पटेल , ड रविराज व्ही राठोड, ड. दत्ता अनंत केसकर, ड. शेख शिकंदर यांनी मोलाचे सहकार्य केले.

### श्री स्वामी सेवा केंद्र, पाटोदा

उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

संपूर्ण शहर सकाळपासून स्वामीमय वातावरणात न्हाऊन निघाले होते. ढोल-ताशांचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद, भगव्या ध्वजांची दिमाखदार शोभा आणि 'श्री स्वामी समर्थ' नामघोषामुळे परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता.

पालखी सोहळ्याची सांगता महाआरतीने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. गुरुपौर्णिमेनिमित्त केंद्रात विविध धार्मिक सेवा व विधीही संपन्न झाले. या सोहळ्यात लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व भाविकांनी श्रद्धाभावाने सहभाग घेत स्वामीकृपेचा लाभ घेतला.

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
गुरूवार दि.३० जुलै २०२६
४

# पीकविम्याच्या तुटपुंज्या नुकसान भरपाईमुळे शेतकऱ्यांचा योजनेवरील विश्वास उडाला!

## अर्जांची संख्या ९३.८० लाखांवरून २५.५४ लाखांवर

पुणे : राज्यात पावसाळ्याचा अर्धा हंगाम संपत आला असून खरीप पेरण्या जवळपास पूर्ण झाल्या आहेत. मात्र, गत हंगामातील पीकविमा भरपाईची प्रतीक्षा अनेक शेतकऱ्यांना अजूनही करावी लागत आहे. ज्या शेतकऱ्यांना भरपाई मिळाली आहे, त्यांच्यामध्येही समाधानाचे वातावरण नाही. नुकसानाच्या तुलनेत मिळालेली भरपाई अत्यल्प असल्याने पीकविमा योजनेबाबत शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे.याच पार्श्वभूमीवर यंदा प्रधानमंत्री पीकविमा योजनेतील अर्जांची संख्याही मोठ्या प्रमाणात घटली आहे. गतवर्षी ९३ लाख ८० हजार अर्ज दाखल झाले होते. त्याच्या तुलनेत यंदा आतापर्यंत केवळ २५ लाख ५४ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. ही घट शेतकऱ्यांचा पीकविमा व्यवस्थेवरील कमी होत चाललेला विश्वास दर्शवत असल्याचे मानले जात आहे.

प्रधानमंत्री पीकविमा योजना ही जगातील सर्वात मोठ्या कृषी विमा योजनांपैकी एक आहे. या योजनेत खरीप पिकांसाठी दोन टक्के, रब्बी पिकांसाठी दीड टक्का आणि व्यापारी व फलोत्पादन पिकांसाठी पाच टक्के प्रीमियम शेतकऱ्यांकडून आकारला जातो. उर्वरित प्रीमियम केंद्र आणि राज्य सरकारकडून भरला जातो. एवढे मोठे अनुदान मिळूनही शेतकरी योजनेपासून दूर जात असल्याने योजनेच्या



अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. सध्या अस्तित्वात असलेली पीकविमा योजना ही उत्पादनाधारित आहे. त्यामुळे भरपाईचे मूल्यांकन प्रत्येक शेतकऱ्याच्या प्रत्यक्ष नुकसानीवर न करता गाव, महसूल मंडळ किंवा विमा युनिटमधील सरासरी उत्पादनाच्या आधारे केले जाते. परिणामी एखाद्या शेतकऱ्याचे संपूर्ण पीक नष्ट झाले, तरी परिसरातील सरासरी उत्पादन चांगले असल्यास त्याला अपेक्षित नुकसानभरपाई मिळत नाही. कृषी अर्थशास्त्रात यालाच 'आधारभूत जोखीम' असे म्हटले जाते. याच मुद्द्यावरून महाराष्ट्रातील विविध शेतकरी संघटना सातत्याने आक्षेप घेत आहेत. त्यांचा दावा आहे की, प्रत्यक्ष नुकसान आणि विमा निकषांतील तफावत दूर केल्याशिवाय शेतकऱ्यांचा योजनेवरील विश्वास परत मिळणे कठीण आहे. तज्ज्ञांच्या मते, शेतीसमोरील सर्वात मोठे संकट आता केवळ उत्पादन घटण्याचे राहिलेले नाही. अनेकदा उत्पादन चांगले होते.

मात्र बाजारभाव कोसळल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न घटते. उदाहरणार्थ, सोयाबीनचे विक्रमी उत्पादन होऊनही बाजारभाव निम्म्यावर आल्यास शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान होते. अशा परिस्थितीत उत्पादनाधारित विमा कोणताही दिलासा देऊ शकत नाही. त्यामुळे केवळ उत्पादन नव्हे, तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नालाही संरक्षण देणारी उत्पन्नाधारित पीकविमा योजना लागू करण्याची मागणी आता अधिक जोर धरत आहे. जगातील अनेक विकसित कृषी अर्थव्यवस्थांनीही उत्पादनाधारित विम्याऐवजी उत्पन्नाधारित विमा पद्धतीला प्राधान्य दिले असून, भारतातही त्या दिशेने पावले उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# सोयाबीनची पाने नक्की कशामुळे पिवळी पडतात?

यावर्षी अल निनोच्या पार्श्वभूमीवर मान्सूनच्या आगमनास विलंब झाला असून पावसाची सुरुवात अनियमित झाली. त्यामुळे सोयाबीनची पेरणी सर्वत्र एकाच वेळी न होता टप्प्याटप्प्याने झाली.तसेच अनेक भागांमध्ये आतापर्यंत झालेला पाऊस सरासरीपेक्षा कमी असल्याने सोयाबीनची अपेक्षित वाढ होताना दिसून येत नाही.

अशा परिस्थितीत जमिनीतील अपुऱ्या आर्द्रतेमुळे व प्रतिकूल वातावरणामुळे सोयाबीनच्या मुळांद्वारे आवश्यक अन्नद्रव्यांचे, विशेषतः लोह (फेरस) या सूक्ष्म अन्नद्रव्याचे शोषण व्यवस्थित होत नाही. परिणामी, सोयाबीनच्या सुरुवातीच्या वाढीच्या अवस्थेत पाने पिवळी किंवा पांढरट पडणे (क्लोरोसिस) ही लक्षणे मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत.

क्लोरोसिस म्हणजे काय?

लोह (फेरस) या सूक्ष्म अन्नद्रव्याचे झाडाकडून पुरेसे शोषण न झाल्यास सोयाबीनमध्ये क्लोरोसिस ही शारीरिक विकृती दिसून येते.ही समस्या केवळ जमिनीत लोहाचे प्रमाण कमी असल्यामुळे उद्भवत नाही, तर जमिनीत लोह उपलब्ध असूनही ते झाडांना शोषून घेता न आल्यमुळे निर्माण होते.

लक्षणे लोह (फेरस) या सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता सर्वप्रथम कोवळ्या पानांवर दिसून येते. पानांच्या शिरा हिरव्या राहतात, तर शिरांमधील भाग पिवळा पडतो.

सुरुवातीची त्रिदलीय (ट्रायफोलिएट) पाने काही काळ हिरवी राहतात, तर नवीन पानांवर लक्षणे स्पष्ट दिसतात. हरितद्रव्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे प्रकाशसंश्लेषणाची क्रिया मंदावते. झाडांची वाढ खुंटते व उत्पादनात घट येते.

कारणे : चुनखडीयुक्त व कमी निचऱ्याच्या जमिनीत ही समस्या अधिक प्रमाणात आढळते.जमिनीचा सामू (पीएच) ७.५ पेक्षा जास्त असल्यास लोह पिकांना उपलब्ध स्वरूपात राहत नाही.ते फेरिक स्वरूपात रूपांतरित झाल्यामुळे पिकांना शोषून घेता येत नाही. जमिनीत जास्त ओलावा किंवा मुळांना ऑक्सिजनचा कमी पुरवठा झाल्यास लोहाचे शोषण कमी होते. पावसाची उघडीप, ढगाळ वातावरण व प्रतिकूल मृदा परिस्थितीमुळेही लोहाचे शोषण बाधित होऊ शकते.

एकात्मिक व्यवस्थापन : पाण्याचा ताण पडल्यास तुषार सिंचनाद्वारे संरक्षित पाणी द्यावे. डीटीए चिलेटेड मिश्र सूक्ष्म अन्नद्रव्य (ग्रेड-२) ५० ग्रॅम किंवा ५० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.आवश्यकतेनुसार ८-१० दिवसांनी दुसरी फवारणी करावी. ज्या शेतात अतिरिक्त पाणी साचले असेल तेथील पाण्याचा त्वरित निचरा करून वाफसा स्थिती निर्माण करावी.वापसा आल्यानंतर व पीक ३०-३५ दिवसांचे होण्यापूर्वी एक कोळपणी करावी. महत्त्वाच्या सूचना : सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी करावी. त्यामुळे अन्नद्रव्यांचे शोषण अधिक प्रभावी होते.शिफारशीत मात्रेपेक्षा जास्त प्रमाणात सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करू नये. जास्त प्रमाणामुळे पानांवर करपण्याची शक्यता



असते.जमिनीचा सामू (पीएच) जास्त असलेल्या शेतात नियमित सेंद्रिय खतांचा वापर केल्यास सूक्ष्म अन्नद्रव्यांची उपलब्धता सुधारण्यास मदत होते.क्लोरोसिसची सुरुवातीची लक्षणे दिसताच त्वरित उपाययोजना केल्यास प्रकाश संश्लेषण सुरळीत राहून उत्पादनातील संभाव्य घट टाळता येते.

# ड्रॅगन फ्रूट शेतीत कमी पाण्यातही भरघोस नफा!

बदलत्या हवामानात पारंपरिक शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळवणे दिवसेंदिवस कठीण होत असताना हिंगोली तालुक्यातील सावा येथील प्रगतिशील शेतकरी विठ्ठल शिंदे यांनी आधुनिक शेतीचा यशस्वी प्रयोग करून अनेकांसमोर आदर्श निर्माण केला आहे. सहा वर्षांपूर्वी अवघ्या एका एकरात ड्रॅगन फ्रूटची लागवड करण्याचा धाडसी निर्णय घेतलेल्या शिंदे यांनी आज या पिकातून भरघोस उत्पादन आणि चांगले आर्थिक उत्पन्न मिळवले आहे.सध्या त्यांच्या शेतात ड्रॅगन फ्रूटची तोडणी सुरू असून एका एकरातून ७० ते ८० क्विंटल उत्पादन मिळत आहे. बाजारात प्रतिक्विंटल सुमारे १० हजार रुपये दर मिळत असल्याने हे पीक त्यांच्यासाठी उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन ठरले आहे

पारंपरिक पिकांऐवजी आधुनिक शेतीचा निर्णय

कापूस, सोयाबीन आणि इतर पारंपरिक पिकांमध्ये वाढता खर्च, हवामानाचा फटका आणि बाजारभावातील अनिश्चितता पाहता विठ्ठल शिंदे यांनी काहीतरी वेगळे करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी बाजारात सातत्याने मागणी असलेल्या ड्रॅगन फ्रूट या फळपिकाची निवड केली.सुरुवातीला अनेकांनी शंका व्यक्त केली, मात्र योग्य नियोजन, तांत्रिक मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण व्यवस्थापनाच्या जोरावर त्यांनी हा प्रयोग यशस्वी करून दाखवला.

एका एकरातून ७० ते ८० क्विंटल उत्पादन

सध्या शिंदे यांच्या शेतात दर तीन ते चार दिवसांनी नियमित तोडणी केली जाते. तयार झालेला माल हिंगोली बाजारात विक्रीसाठी पाठविला जातो.एका एकरातून ७० ते ८० क्विंटल उत्पादन मिळत असून प्रतिक्विंटल सुमारे १० हजार रुपयांचा बाजारभाव मिळत असल्याने या पिकातून चांगले आर्थिक उत्पन्न मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.



कमी पाण्यातही तग धरणारे पीक

ड्रॅगन फ्रूटचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हे पीक कमी पाण्यातही चांगले उत्पादन देते.दुष्काळी परिस्थितीतही झाडे टिकून राहतात. पाण्याची कमतरता असल्यास फळांचा आकार काहीसा कमी होतो, मात्र संपूर्ण पीक नष्ट होत नाही. त्यामुळे पाण्याची टंचाई असलेल्या भागातील शेतकऱ्यांसाठी हे पीक चांगला पर्याय ठरत आहे.

रोग व किडींचा प्रादुर्भाव अत्यल्प

ड्रॅगन फ्रूट पिकावर रोग आणि किडींचा प्रादुर्भाव तुलनेने कमी असल्याने कीटकनाशके आणि बुरशीनाशकांवरील खर्चही कमी येतो. त्यामुळे उत्पादन खर्च कमी राहून नफा वाढण्यास मदत होते.

लागवडीसाठी योग्य हवामान आणि जमीन तापमान : २५ ते ३५ अंश सेल्सिअस पर्जन्यमान : ५०० ते १००० मिमी

जमीन : चांगला निचरा होणारी वालुकामय किंवा मध्यम हलकी जमीन ही परिस्थिती सर्वाधिक अनुकूल ठरते. लागवडीची पद्धत या पिकासाठी साधारण १५ ते २० सेंटीमीटर लांबीच्या कटिंग्ज वापरल्या जातात.दोन झाडांमधील अंतर - ३ मीटर दोन ओळींमधील अंतर - ३ मीटरसिमेंट काँक्रीटचे खांब उभारून वेल वाढवला जातो.प्रत्येक खड्ड्यात शेणखत, माती, वाळू आणि सिंगल सुपर फॉस्फेटचा वापर केला जातो.योग्य व्यवस्थापन केल्यास झाडे अनेक वर्षे उत्पादन देत राहतात.ड्रॅगन फ्रूटचे विविध उपयोगड्रॅगन फ्रूटची मागणी केवळ ताज्या फळासाठीच नसून प्रक्रिया उद्योगातही मोठ्या प्रमाणावर आहे.याचा उपयोग ज्यूस, शरबत, जॅम, जेली, सिरप, आईस्क्रीम, कँडी, पेस्ट्री, वाईन निर्मितीसाठी केला जातो.

याशिवाय या फळामध्ये अँटीऑक्सिडंट्स, फायबर आणि इतर पोषक घटक मुबलक असल्याने आरोग्यदायी फळ म्हणूनही त्याची मागणी वाढत आहे. इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी संदेश वठ्ठल शिंदे यांच्या मते, बदलत्या काळात शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांसोबत बाजारपेठेचा अभ्यास करून आधुनिक आणि मूल्यवर्धित फळपिकांकडेही वळण्याची गरज आहे. त्यांच्या यशामुळे हिंगोली जिल्ह्यासह परिसरातील अनेक शेतकरी ड्रॅगन फ्रूट लागवडीबाबत माहिती घेण्यासाठी त्यांच्या शेताला भेट देत आहेत.

आधुनिक शेतीचा आदर्श

अवघ्या एका एकरातून चांगले उत्पादन, कमी पाण्याची गरज, कमी उत्पादन खर्च आणि आकर्षक बाजारभाव या चार गोष्टींमुळे ड्रॅगन फ्रूट शेती अनेक शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा विश्वासार्ह पर्याय ठरत आहे. सावा येथील विठ्ठल शिंदे यांनी आधुनिक शेतीचा स्वीकार करून केवळ स्वतः चे उत्पन्न वाढवले नाही, तर इतर शेतकऱ्यांसाठीही प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.




### जागतिक दिवस
### आंतरराष्ट्रीय फ्रेंडशिप डे

### महत्वाच्या घटना

७६२: खलिफा अल मन्सूरने बगदाद शहराची स्थापना केली.
१६२९: इटलीतील नेपल्स शहरात झालेल्या भूकंपात सुमारे १०,००० जण मृत्यूमुखी पडले.
१८३६: अमेरिकेतील हवाई या शहरात पहिला इंग्रजी भाषिक वृत्तपत्र प्रकाशित झाले.
१८९८: विल्यम केलॉग याने 'कॉर्नफ्लेक्स' विकसित केले.
१९०९: अमेरिकन वैमानिक व शास्त्रज्ञ राईट बंधू(थीळसहीं लीींहशीी) यांनी सैन्यांसाठी पहिले विमान तयार केले.
१९३०: पहिला फुटबॉल विश्वचषक उरुग्वेने जिंकला.
१९६२: 'ट्रान्स कॅनडा हायवे' हा सुमारे ८,०३० किमी लांबीचा जगातील सर्वात मोठा राष्ट्रीय महामार्ग सुरू झाला.
१९६६: इंग्लंड च्या फुटबॉल संघाने पहिल्यांदा विश्वकप जिंकला.
१९७१: अपोलो १५ चंद्रावर उतरले.
१९९७: गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना 'राजीव गांधी राष्ट्रीय सद्भावना पुरस्कार' जाहीर
२०००: चंदन तस्कर वीरप्पनने अभिनेते डॉ. राजकुमार यांचे अपहरण केले.
२०००: कोणत्याही प्रवासी वाहनातून एखादा प्रवासी अपघाताने खाली पडून त्याचा मृत्यू झाल्यास त्याबद्दल त्या वाहनचालकाला जबाबदार धरता येणार नाही, असा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल
२००१: राजस्थानातील अलवर येथील राजेंद्रसिंह यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर. छोटे बंधारे बांधून पाणी साठवण्याबाबत त्यांनी लोकसहभागातून मोठे काम केले आहे.
२०१२: दिल्लीतील पावर ग्रिड खराब झाल्यामुळे उत्तर भारतील ३० कोटी पेक्षा जास्त लोकांची वीज खंडित झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१८: एमिली ब्राँट - इंग्लिश लेखिका (मृत्यू: १९ डिसेंबर १८४८)
१८२२: वाजिद अली शाह
१८५५: जॉर्ज विलहेम फॉन सिमेन्स - जर्मन उद्योगपती (मृत्यू: १४ आक्टोबर १९१९)
१८६३: हेन्री फोर्ड - फोर्ड मोटर कंपनीचे संस्थापक (मृत्यू: ७ एप्रिल १९४७)
१८८६: पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय महिला चिकित्सक व समाजसुधारक मुथुलक्ष्मी रेड्डी यांचा जन्मदिन.
१९२३: पद्मश्री पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय इतिहासकार, संस्कृतज्ञ व सौंदर्यशास्त्री गोविंदचंद्र पांडे यांचा जन्मदिन.
१९२८: साली पद्मश्री पुरस्कार व महाराष्ट्र भूषण पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय मराठी व हिंदी चित्रपट अभिनेत्री सुलोचना लाटकर यांचा जन्मदिन.
१९४५: सेवानिवृत्त भारतीय नागरी सेवक व भारताचे माजी १६ वे मुख्य निवडणूक आयुक्त आणि लेखक नवीन चावला यांचा जन्मदिन.
१९४७: अर्नोल्ड श्वार्झनेगर - जन्माने ऑस्ट्रियन असलेले अमेरिकन शरीरसौष्ठवपटू, अभिनेते आणि कॅलिफोर्नियाचे ३८ वे राज्यपाल
१९५१: भारतीय-इंग्रजी चित्रकार आणि मूर्तिकार गॅरी यहूदा यांचा जन्म.
१९६२: भारतीय दहशतवादी यकब मेमन यांचा जन्म. (मृत्यू: ३० जुलै १९६२)
१९७३: सोनू निगम - पार्श्वगायक
१९८०: इंग्लिश क्रिकेट खेळाडू जेम्स अँडरसन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६२२: संत तुलसीदास यांनी देहत्याग केले.
१७१८: पेनसिल्व्हेनियाचे स्थापक विल्यम पेन यांचे निधन.
१७७१: अठराव्या शतकातील प्रसिद्ध इंग्रजी कवी, पत्र-लेखक व शास्त्रीय अभ्यासक थॉमस ग्रे (ढहोरी ऋीरू) यांचे निधन.
१८९८: ऑटो फॉन बिस्मार्क - जर्मनीचा पहिला चॅन्सेलर (जन्म: १ एप्रिल १८१५)
१९३०: बार्सिलोना फुटबॉल क्लब चे स्थापक जोन गॅम्पर यांचे निधन. (जन्म: २२ नोव्हेंबर १८७७)
१९४७: ऑस्ट्रेलियाचे ६वे पंतप्रधान जोसेफ कूक यांचे निधन.
१९६०: 'कर्नाटक सिंह' गंगाधर बाळकृष्ण देशपांडे - स्वातंत्र्यसैनिक (जन्म: ३१ मार्च १८७१)
१९८३: वसंतराव देशपांडे - शास्त्रीय व नाट्यसंगीत गायक (२ मे १९२०)
१९९४: शंकर पाटील - साहित्यिक, चित्रपट कथालेखक, ग्रामीण कथालेखक, भारतीय चित्रपट महामंडळाचे संस्थापक सचिव आणि 'बालभारती'चे संपादक. त्यांचे 'चोरा मी वंदिले', 'सागराचे पाणी', 'सवाल', 'बाजिंदा' हे कथासंग्रह तसेच 'सरपंच', 'इशारा', 'घुंगरू', 'कुलवंती', 'बेईमान', 'ललाट रेषा', 'सुन माझी सावित्री' या कादंबर्या हे गाजलेले साहित्य आहे. (जन्म: ८ ऑगस्ट १९२६)
१९९५: डॉ. विनायक महादेव तथा 'वि. म.' दांडेकर - अर्थतज्ञ, 'इंडियन स्कूल ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी' या संस्थेची त्यांनी उभारणी केली. त्यांचे 'पॉव्हर्टी इन इंडिया' हे पुस्तक गाजले (जन्म: ६ जुलै १९२०)
१९९७: व्हिएतनामचा राजा बाओडाई यांचे निधन.
२००७: स्विडिश चित्रपट दिग्दर्शक इंगमार बर्गमन यांचे निधन.
२००७: इटालियन चित्रपट दिग्दर्शक मिकेलांजेलो अँतोनियोनी यांचे निधन.
२०११: डॉ. अशोक रानडे - संगीत समीक्षक (जन्म: २५ आक्टोबर १९३७)
२०१३: भारतीय-इंग्रजी लेखक, कवी आणि नाटककार बेंजामिन वॉकर यांचे निधन. (जन्म: २५ नोव्हेंबर १९१३)





# जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी केली मुलांच्या वसतिगृहाची पाहणी

जालना। प्रतिनिधी

येथील समाजकल्याण विभागाच्या मुलांच्या वसतिगृहाला जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी (दि.२८ रोजी) अचानक भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांचे राहणीमान, अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता, आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच उपलब्ध पायाभूत सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा तातडीने करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. भेटी दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी वसतिगृहातील इमारत, भोजनगृह व स्वयंपाकघराची पाहणी करून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भोजनाची गुणवत्ता तपासली. विद्यार्थ्यांना सकस, पौष्टिक आणि स्वच्छ अन्न मिळणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. परिसरातील स्वच्छता, आरोग्यविषयक सुविधा, विद्यार्थ्यांच्या खोल्या, स्वच्छतागृहे, व्यायामशाळा तसेच संगणक प्रयोगशाळेचीही त्यांनी पाहणी केली.

वसतिगृहाच्या इमारतीची सद्यस्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने




स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश दिले. तसेच खिडक्या, दरवाजे, स्वच्छतागृहे यांची दुरुस्ती, इमारतीची रंगरंगोटी तसेच नागरी आणि विद्युत दुरुस्तीची कामे तातडीने प्रस्तावित करून पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून वसतिगृहात डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मच्छरदाणी उपलब्ध करून देणे, नियमित फवारणी करणे आणि आवश्यक डास प्रतिबंधक साधनांची व्यवस्था करण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. सुरक्षेच्या दृष्टीने वसतिगृहात कडक सुरक्षा व्यवस्था सुनिश्चित करण्याबरोबरच आवश्यकतेनुसार प्रशिक्षित सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. वसतिगृह परिसरात मद्यपान, व्यसन किंवा अंमली पदार्थांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका घेत 'झिरो टॉलरन्स' धोरण अवलंबण्याचे आदेश त्यांनी दिले. यावेळी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या अडचणी, शिक्षण, भविष्यातील ध्येय आणि करिअर विषयी चर्चा केली. विद्यार्थ्यांनी पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, भोजनाचा दर्जा, नाश्त्याचा मेनू, वाय-फाय सुविधा तसेच खिडक्या व दरवाजांच्या दुरुस्तीबाबतच्या समस्या मांडल्या. या सर्व मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग, संगीत वर्ग, एरोबिक्स व नियमित शारीरिक व्यायाम तसेच करिअर मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध उपक्रम सुरू करण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने मेहनत घ्यावी, असा प्रेरणादायी संदेशही त्यांनी यावेळी दिला. जिल्हाधिकाऱ्यांची ही भेट केवळ वसतिगृहाच्या पाहणीपुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित प्रश्न समजून घेण्याचा आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा संदेश देणारी ठरली. विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ, शिस्तबद्ध, व्यसनमुक्त आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

# घरासमोर खेळणाऱ्या तीन वर्षीय बालकावर पिसाळलेल्या मोकाट कुत्र्याने केला हल्ला

अहिल्यानगर। प्रतिनिधी

शहरातील मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. बागरोजा परिसरातील जुन्या साताळकर हॉस्पिटल परिसरात घरासमोर खेळणाऱ्या एका तीन वर्षीय बालकावर मोकाट कुत्र्याने मंगळवारी दुपारी हल्ला केला. मुलाच्या ओरडण्याचा आवाज ऐकून त्याच्या आईने धाव घेत त्याची सुटका केली. दरम्यान, ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून हा व्हिडिओ शहरात व्हायरल झाल्यावर नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे. कुत्रे पकडण्यासाठी संपूर्ण शहरासाठी दोनच गाड्या असल्याने ठोस उपाययोजना होत नसल्याचे समोर आले आहे.

बागरोजा परिसरातील एक तीन वर्षीय मुलगा घरासमोर खेळत असताना मोकाट कुत्र्याने पाठीमागून त्याच्यावर झडप घालून हल्ला केला. यात बालकाच्या खांद्याला जखम झाली आहे. ओरडण्याचा आवाज ऐकून धावत आलेल्या त्याच्या आईने कुत्र्याच्या तावडीतून त्याची सुटका केली. दरम्यान, घटनेची माहिती मिळाल्यानंतर महापालिकेचे कुत्रे पकडणारे पथक घटनास्थळी रवाना करण्यात आले. सुमारे दोन तास पथक कुत्र्याचा शोध घेत होते. मात्र, परिसरातील संतप्त नागरिकांनी घटनेनंतर या मोकाट कुत्र्याला मारून टाकल्याचे समोर आले. मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढत आहे. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आणखी एक वाहन व काही कर्मचारी वाढवण्यात आले आहेत. सध्या दोन वाहने व कर्मचाऱ्यांकडून सकाळी व रात्री अशा दोन शिफ्टमध्ये कुत्रे पकडण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. - यशवंत डांगे, आयुक्त, महापालिकाजुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात टिळक रस्त्यावर एका



पिसाळलेल्या कुत्र्याने अवघ्या पाच ते सहा तासात सुमारे ३८ नागरिकांवर हल्ला केल्याची घटना घडली होती. त्यानंतरही मोकाट कुत्र्याच्या हल्ल्याच्या घटना घडत आहेत. गुलमोहर रस्त्यावर महापौरांच्याच प्रभागात मोकाट कुत्र्यांचा उच्छाद वाढला आहे. महापौरांनी सूचना देऊनही यावर कारवाई झालेली नाही. आता बालिकाश्रम रस्त्यावरील बागरोजा परिसरात पुन्हा घटना घडली आहे.

शहरात सुमारे २५ हजार मोकाट कुत्री असल्याचे प्रशासनाकडून वेळोवेळी सांगितले जाते. या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी विशेष मोहीम राबवण्याची मागणीही झाली. मात्र, कुत्री पकडल्यानंतर व निर्बीजीकरण केल्यानंतर त्यांना ठेवण्यासाठी मोठे डॉग शेल्टर आवश्यक आहे. सध्या पिंपळगाव माळवी येथे एवढ्या मोठ्या क्षमतेचे शेल्टर नाही. नवीन शेल्टरचे कामही रखडलेले आहे. त्यामुळे विशेष मोहीम राबवण्यापूर्वी सुमारे एक हजार कुत्री एकावेळी ठेवता येतील एवढे मोठे डॉग शेल्टर उभारण्याचे आव्हान मनपासमोर आहे.

# पंकजा मुंडे यांनी विधायक कार्यातून स्वत:चा ठसा उमटवला-अमोल गर्जे!

पाथर्डी । प्रतिनिधी

संघर्षपूर्ण जीवन लढत प्रत्येक संकटाला सामोरे जात लोकनेत्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी राज्यामध्ये स्वतःच्या नेतृत्वाचा ठसा उमटवला त्याग जिद्द व कार्याच्या जोरावर भाजप नेत्या व मंत्री पंकजा मुंडे यांनी सर्वसामान्यांच्या मनामध्ये स्थान निर्माण केले असे मत नगरसेवक अमोल गर्जे यांनी व्यक्त केले पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त अमोल गर्जे मित्र मंडळातर्फे मतिमंद मुलांचे बालगृह येथे वृक्षारोपण विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन श्रीकृष्ण गोशाळेतील गाईंना चारा वाटप असा कार्यक्रम करण्यात आला या कार्यक्रमाप्रसंगी अमोल गर्जे बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री तर प्रमुख पाहुणे म्हणून मुकुंद गर्जे ड प्रतीक खेडकर धर्म जागरण समितीचे प्रमुख बाळासाहेब गीते शनेश्वर पतसंस्थेचे अध्यक्ष महेश पठाडे उद्योजक अक्षय काळे गौरव शेटे व किरण पुरी ज्योती क्रांती पतसंस्थेचे व्यवस्थापक प्रशांत तुपे महेश काटे मंथन निराळी यश गर्जे शुभम इजारे आदींसह विद्यालयाचे कर्मचारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी बोलताना अमोल गर्जे म्हणाले पाथर्डी तालुक्याची व मुंडे परिवाराची अत्यंत जवळीक असून



राज्यातील कष्टकरी दलित आदिवासी गोर गरीब शेतकरी ऊस तोडणी कामगार असे सर्वसामान्य वर्गतील कार्यकर्ते मुंडे यांच्याशी भावनिक दृष्टीने जोडले गेले आहेत मुंडे यांच्या कार्याचे शब्दातून मूल्यमापन होऊ शकत नाही परंतु सर्वसामान्य जनतेचा आवाज म्हणून त्यांच्याकडे बघितले जात असताना प्रत्येकाला मुंडे यांचा भावनिक आधार वाटतो लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याचा वसा घेत गेल्या काही वर्षांपासून पंकजा यांनी ज्या पद्धतीने राजकारण समाजकारण विकास कारण अशा विविध आघाड्यांवर यशस्वीपणे काम केले त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची स्वतंत्रपणे सर्वत्र ओळख झाली संघटन कौशल्य व प्रश्नाची सोडवणूक करण्याची क्षमता असल्याने कार्यकर्त्यांचा संच वाढत गेला आजही राज्याच्या सार्वजनिक जीवनामध्ये मुंडे परिवाराचे वेगळे स्थान आहे वाढदिवसाच्या दिवशी समाज उपयोगी विधायक उपक्रम करावेत अशी विनंती करत मुंडे यांनी जाहीर कार्यक्रम फारसे ठेवले नाहीत यातच त्यांची दृष्टी व सार्वजनिक कार्याची तळमळ दिसून येते पाथर्डी तालुक्यावर मुंडे कुटुंबाचे अत्यंत उपकार असून संपूर्ण तालुका त्यांच्याशी भावनिकदृष्ट्या जोडला गेला आहे पर्यावरण विषयक खात्यालाही त्यांनी चांगला न्याय दिला असून आगामी काळात सर्व कार्यकर्त्यांना एकत्रित करत मुंडे यांनी विधायक सामाजिक कार्यासाठी प्रोत्साहन द्यावे असे अमोल गर्जे म्हणाले कार्यक्रमाचे प्रास्ताविक भगवान पायमोडे सूत्रसंचालन गौरव खताळ तर आभार शुभम तुपे यांनी मानले.

# स्वामी समर्थ मंदिरात महाप्रसाद व रक्तदान शिबिर संपन्न

अंबड। प्रतिनिधी

श्री गुरू पौर्णिमा उत्सवा निमित्त श्री स्वामी समर्थ मंदिर अंबड येथे सदुरू श्री स्वामी समर्थ पुजन, महाआरती, अन्नदान महाप्रसाद व भव्य रक्तदान शिबिर झाले, यामध्ये १२ महिला व ५१ पुरुष सेवेकरी असे ६३ भाविकांनी रक्तदान केले व २००० भाविकांनी दर्शन, पुजन व महाप्रसादाचा लाभ घेतला. यामध्ये रक्त दाते महिलांचा उत्स्फुर्त प्रतिसाद होता. १. भाग्येश रवनेकर, २. विनोद जाधव, ३. प्रशांत कानडे, ४. रमेश गायकवाड, ५. मुकुंद खरात, ६ अन्नासाहेब शिंगाडे, ७. धनंजय पानखडे, ८. शिवराज भावले, ९. शरद जाधव, १०. गजानन कोकलवार, ११. दिगंबर जाधव, १२. दिपक चौधरी, १३. किशोर नरवडे, १४. संदिप मुळे, १५. निलेश




पाचफुले, १६. अक्षय भवर, १७. यशवंत बिराजदार, १८. अविनाश मते, १९. प्रविण भवर, २०. अजित उढाण, २१. गणेश साळे, २२. दिपक पैठणे, २३. किशोर मुर्तडकर, २४. सुरेश तंगडपल्ली, २५. सचिन साठे, २६. महेश जगदळे, २७. सौ. प्रियंका बोचरे, २८. धिरज जोशी, २९. अश्विनी वैद्य, ३० साँ नंदा कळवणे, ३१. विरेंद काळे, ३२. सौ. गिता सिरसाट, ३३. डॉ. वैभव वानखेडे, ३४. सौ. अंबिका शेलार, ३५. शितल उध्दव वैद्य, ३६. सौ. गिताजली वाघुंडे, ३७. गणेश बोबडे, ३८. सौ. सविता शिंदे, ३९. मितेश जेठवा, ४०. रोहन भोसले, ४१. अविनय सारडा, ४२. कु. निकिता राठोड, ४३. पारस जाधव, ४४. पवन साळुंखे, ४५. शुक्रजय काळेगोरे, ४६. अक्षय हरणे, ४७. शारदा देवळकर, ४८. सौ. छाया जाधव, ४९. अभिषेक सारडा, ५०. सुदर्शन कामठे, ५१. सौ. अलका गोदे, ५२. महादु रावडे, ५३ विनोद शिंदे, ५४. विनोद मगर, ५५. अप्पासाहेब उगले, ५६. ऋषिकेश भवर, ५७. माऊली काळे, ५८ सुनिल गिरी, ५९. ओंकार भवर, ६०. शरद भवर ६१. नरेंद माटोले, ६२ पुरुषोत्तम ढोले, ६३ प्रदिप जिगे ईत्यादींनी रक्तदान केले.हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंदिराचे अध्यक्ष श्री केदार मंत्री, कोषाध्यक्ष इंद्रजित गिराम, सदस्य डॉ. सतिष सारडा, श्री रमेश सोनवणे, सतिष सोडाणी, व्यवस्थापक पंढरीनाथ जाधव, विठ्ठल माने, सेवेकरी, पियुश माटोले, प्रशांत खोमने, अभिनय सारडा, अभिषेक सारडा, सुरेश दरक, सुशिल खरात, डॉ. संध्या सारडा, असंख्य महिला व पुरुष सेवेकरी यांनी परिश्रम घेतले.

# उपवर्गीकरणाच्या विरुध्द भीमसैनिकांचा मोर्चा: जिल्हाभरातून हजारो आंबेडकरी अनुयायांची उपस्थिती

धाराशिव। प्रतिनिधी

दिलंय भीमान, खा गुनाणं',उपवर्गीकरण करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो', जय भीम, जय संविधान', अशा गगनभेदी घोषणा, भीमगीतांचा ताल, निळ्या झेंड्याचा झगमगाट, हातात घोषवाक्यांचे फलक घेऊन शिस्तबद्ध पद्धतीने चालणारे हजारो भीमसैनिक त्यात धो धो पडणारा पाऊस, अशा वातावरणात धाराशिवमध्ये मंगळवारी उपवर्गीकरणविरोधी मोर्चा जल्लोषात काढण्यात आला. मोर्चाचे नेतृत्व रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, कृती समितीचे समन्वयक धनंजय शिंगाडे यांनी केले.

अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या सरकारच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी येथे आंबेडकरी जनतेच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. मोर्चा राष्ट्रमाता जिजाऊ चौकातून दुपारी दोन वाजता धो-धो पावसात सुरू झाला. सुरुवातीपासूनच मोर्चात रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर, मोर्चाचे मुख्य आयोजक धनंजय शिंगाडे, अमित आनंदराज आंबेडकर, चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष महादेव गायकवाड, राजाभाऊ ओव्हाळ, कैलास शिंदे, नितीन शेरखाने, संजय बनसोडे, डी. जे. हौसलमल आदी सहभागी झाले होते. मोर्चाच्या सुरुवातीपासूनच मोठ्या प्रमाणात पावसाला सुरुवात झाली होती. तरीही जिल्हाभरातून आलेल्या आंबेडकरी जनतेत प्रचंड उत्साह व जल्लोष दिसून येत होता. मोर्चात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत मोठ्या प्रमाणात नागरिक सहभागी झाले होते. मोर्चाचे रूपांतर जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आल्यानंतर मोठ्या सभेत झाले. पावसातही सभा सुरूच होती. अशा मोठ्या प्रमाणात पडणाऱ्या पावसामध्येही मोर्चेकरांचा जल्लोष थोडाही कमी झाला नाही. मुसळधार पावसाच्या सरी कोसळत असतानाही हातात निळे ध्वज घेऊन नागरिकांचा मोर्चात जोरदार जल्लोष दिसून येत होता.

# सीजेपी संस्थापक ४० दिवसांनी घरी विद्यार्थ्यांनी प्रधानांचा राजीनामा घेतला

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

राजधानी दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी देशातील युवकांनासोबत घेऊन विशेषतः जेन-झी पिढीला सोबत घेत मोठे आंदोलन उभारले होते. नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणामुळे ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली, त्याच्या निषेधार्थ त्यांनी हे आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनाला केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आणि यश आले. त्यानंतर तब्बल ४० दिवसांनंतर अभिजीत दीपके महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर येथे दाखल झाले आहेत.

विमानतळावर उतरल्यावर माध्यमांना प्रतिक्रिया देताना अभिजीत दीपके म्हणाले, आज ४० दिवसांनंतर आणि एवढ्या संघर्षानंतर मी माझ्या घरी आलो आहे, याचा मला खूप आनंद आहे. जेव्हापासून मी भारतात आलो तेव्हापासून आंदोलनच सुरू होते. त्यानंतर या आंदोलनाला यश आले आहे, देशातील विद्यार्थ्यांचा विजय झाला आहे. आज घरी येतोय, याचा आनंद होत आहे. आम्ही प्रधानांचा राजीनामा घेतला आहे. सरकारला जाग




आली नाही, तर विद्यार्थी सरकार सुद्धा बदलतील, असा इशाराही त्यांनी दिला.

पुढे बोलताना अभिजीत दिपके म्हणाले, दुसरी महत्त्वाची गोष्ट ही की सरकारने आता सुधरावे. २० जुलैला जे तुम्ही विद्यार्थ्यांचे रक्त वाहिले, ते अतिशय वाईट होते. त्यानंतरही तुमचे मन भरले नाही. वेगवेगळ्या राज्यात ते विद्यार्थ्यांना घरी जाऊन त्रास देत आहेत. ते विद्यार्थी काही आतंकवादी नाही. ते या देशाचे भविष्य आहे. आज तरी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला आहे, सरकार लाइनवर आले नाही, तर हे विद्यार्थी हे सरकार सुद्धा बदलतील, असा इशारा दिपके यांनी दिला आहे.दरम्यान, अभिजीत दीपके यांच्या विमानतळावर आगमनापूर्वी अभिजीतच्या वडिलांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, आम्हाला त्याची काळजी लागलेली असायची. आता तो सुखरूप येत आहे. आणि त्याच्या आईने त्याला गुरु म्हटले आहे, आता त्याच्या आईने म्हटले म्हणजे आहे.

त्याने स्वतःचा जॉब देशासाठी सोडून दिला, या देशाच्या युवकांसाठी त्याने आंदोलन केले. आम्हाला एकदा धमकी सुद्धा आलेली होती. पण ते एकदाच झाले, त्यानंतर असे काही घडले नव्हते. अभिजीत दीपके घरी येणार हे समजल्यावर अभिजीतची आईने माध्यमांना प्रतिक्रिया देताना आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या, आज खूप आनंदाचा दिवस आहे. आज गुरुपौर्णिमा आहे आणि आजच अभिजीत घरी येत आहे.

हा दिवस असाच कसा निवडला गेला, हेही आम्हाला माहिती नाही. पण योगायोग खूप सुंदर आहे. आधी आम्ही त्याचे आई-वडील होतो, पण आता तो आमचा गुरू झाला आहे. विद्यार्थ्यांसाठी त्याने जे काम केलं, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ज्या पद्धतीने संघर्ष केला, त्यामुळे तो आमच्यासाठी गुरूसमान आहे.

# पूछता है धनगर सारा,देवा भाऊ क्या हुआ वादा तेरा

जालना। प्रतिनिधी

धनगर समाजाला एस.टी .आरक्षणाचा दिलेला शब्द न पाळल्याबद्दल धनगर समाज संघर्ष समिती आणि सकल धनगर समाजाच्या वतीने बुधवारी ( ता.२९) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य सरकारचा निषेध नोंदवत विश्वासघात दिन पाळण्यात आला.

अंबड चौफुली जवळील राष्ट्रमाता, महाराणी अहिल्यादेवी होळकर स्मारकाजवळ धनगर समाज संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष भगवान माथले यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी व सकल धनगर समाज बांधवांनी एकत्र येऊन जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी धनगर समाज समितीचे शिवराम वीर, शांतीलाल बनसोडे, बी.एस.आबुज, संतोष कोल्हे ,एस टी.काळे, संदीप बनसोडे, वाघमारे,दहेकर, सुहास गायके ,राम बकाल ,अर्जुन मिसाळ, दीपक खरात, यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्तेत येताच पहिल्याच कॅबिनेट मध्ये धनगर समाजाला एस.टी.चे आरक्षण मिळवून देऊ असा शब्द दिला होता.

बारा वर्षानंतरही दिलेला शब्द न पाळल्याने धनगर समाज बांधवांच्या भावना तीव्र झाल्या असून मुख्यमंत्र्यांनी चालढकल न करता शब्द पाळावा आणि धनगर समाजाला एसटी आरक्षण लागू करावे अशी जोरदार मागणी जिल्हाध्यक्ष यांनी याप्रसंगी केली. दरम्यान मुख्यमंत्र्यांनी विश्वासघात केल्याची भावना समाज बांधवांमध्ये असून एसटी आरक्षणाबाबत तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

दैनिक
राज्य लोकतंत्र



# ना. पंकजाताई यांच्या वाढदिवसानिमित्त १९० गरजू विद्यार्थ्यांना दप्तर वाटप

**माऊली ग्रुप व राजेश चरखा माध्यमातून विद्यार्थ्यांना केली मदत, दुर्गादास लांब यांच्या माध्यमातून बनकरंजा जिल्हा परिषद शाळेत कार्यक्रमाचे आयोजन**

केज । प्रतिनिधी

ना. पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे साहेब, ( मंत्री महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन व पर्यावरण वातावरणीय बदल ) यांच्या वाढदिवसानिमित्त आगळ्यावेगळ्या आणि स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वाढदिवसाच्या अनावश्यक खर्चाला फाटा देत, बीड येथील राजेशजी चरखा ( कोषाध्यक्ष, बीड शहर ) , महादेव नागरगोजे ( तालुका सरचिटणीस बीड ), अमोल वडकिले , कंडू कटले , संतोष गवळी , भालचंद्र कुलकर्णी, सुरेश खराटे , दुर्गादास लांब , यांच्या माध्यमातून ना. पंकजाताई यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना दप्तर (स्कूल बॅग) बनकरंजा जिल्हा परिषद शाळा तालुका केज या ठिकाणी मोफत वाटप करण्यात आले.



सध्या महागाईच्या काळात गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षणासाठी लागणारे साहित्य खरेदी करणे कठीण जाते. हीच बाब लक्षात घेऊनदप्तर वाटप कार्यक्रमाचे आयोजन बनकरंजा येथे दुर्गादास लांब यांच्या माध्यमातून करण्यात आले या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक कुरवडे सर प्रमुख पाहुणे राजेश चरखा यांच्यासह बीड येथील माऊली ग्रुप चे सर्व पदाधिकारी व बनकरंजा गावातील प्रमुख नागरिक उपस्थित होते यांच्या राजेश चरखा व माऊली ग्रुप बीड यांच्या हस्ते जिल्हा परिषद शाळा बनकरंजा ता. केज येथील १९० विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले यावेळी प्रसंगी गावातील विष्णू शंकर नागरगोजे, यांच्यासह गावातील व परिसरातील नागरिक, मान्यवर तथा शाळेतील सर्व शिक्षक, विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्य अतिर्थीनी सांगितले की, वाढदिवसावर अनावश्यक खर्च करण्यापेक्षा अशा सामाजिक उपक्रमांतर्गत गोरगरीब मुलांच्या शिक्षणाला हातभार लावणे हे अत्यंत कौतुकास्पद आहे. या उपक्रमामुळे समाजातील इतर घटकांनाही प्रेरणा मिळेल. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रमेश चाटे सर यांनी केले, तर उपस्थित ग्रामस्थ व लहान मुलांनी वाढदिवसानिमित्त ना. पंकजाताई मुंडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक केले.



## महिला लोककला महोत्सवात प्रतिमा राठौर यांच्या लोकगीताला उत्स्फूर्त दाद

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट शासनाच्या महिला लोककला महोत्सवामध्ये यशवंतराव चव्हान नाटयगृह बीड येथे सौ. प्रतिमा निलेशकुमार राठौर यांनी स्वरांजली कराओके क्लासचे संचालक राहुल गवळी सर यांनी लिहिलेले व संगीतबद्ध केलेले माझ्या पदरात पडलाय बेवडा बाई ग हे लोकगीत उत्कृष्टपने सादर करून प्रेक्षकाची दाद मिळवली . कार्यक्रम संपल्यानंतर सौ. प्रतिमा निलेशकुमार राठौर यांना व सर्व सहभागी कलाकारांना मा. सुशीलाताई मोराळे व मा. अनिता शिंदे यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व पुस्तक देऊन गौरव करण्यात आला. महोत्सवाचे संयोजक प्रा. विनोद दळवी सर त्यांच्या संपूर्ण टीमने केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे महिला लोककला महोत्सव बीडच्या सांस्कृतिक इतिहासातील संस्मरणीय पर्वणी ठरला.

## माझे बाबाच माझे गुरु; त्यांच्या संस्कारांतूनच लोकसेवेसाठी समर्पित जीवनाचा संकल्प

**गुरुपौर्णिमेनिमित्त ना.पंकजाताई मुंडे यांचे लोकनेत्याला मनोभावे नमन!**

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी नागरिकांना शुभेच्छा देत गुरूंच्या ऋणाची जाणीव ठेवून समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. भारतीय संस्कृतीत गुरुपौर्णिमेला विशेष महत्त्व असून जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या प्रत्येक गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले. माझे बाबा लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब हेच माझे गुरु असुन त्यांच्या संस्कारांतूनच लोकसेवेसाठी समर्पित जीवनाचा संकल्प असल्याची दृढ भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

गुरुपौर्णिमेनिमित्त ना. पंकजाताई मुंडे यांनी आपले पिता - नेता आणि गुरु लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना मनोभावे नमन केले. याप्रसंगी सर्वांना शुभेच्छा देत गुरूंच्या ऋणाची महती सांगताना त्यांनी सर्वांना महत्त्वपूर्ण संदेश दिला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, आपल्याला जीवनात उभे राहायला शिकवणारे, घडवणारे सर्वच गुरु हे देवतुल्य आहेत. आई-वडील हे देखील आपल्या जीवनातील पहिले गुरु आहेत. माझ्या आयुष्यातील गुरूस्थान माझे वडील, लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे आहे. त्यांनी मला ◀◀ पान ३ वर



## लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू महिलांना साड्यांचे वाटप व वृक्षारोपण-अशोक रसाळ यांचा स्तुत्य उपक्रम

बीड । प्रतिनिधी

लोकनेत्या तथा महाराष्ट्राच्या मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर विविध सामाजिक उपक्रम उत्साहात राबविण्यात आले. त्यांच्या कार्यकर्त्यांनी समाजातील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणारे अनेक लोकोपयोगी उपक्रम आयोजित केले.



याच अनुषंगाने भारतीय जनता पार्टी, बालाघाट मंडळाचे अध्यक्ष अशोक रसाळ यांच्या पुढाकारातून बालाघाट परिसरामध्ये गरजू व गरीब महिलांसाठी साड्यांचे वाटप करण्यात आले. तसेच उपस्थित महिलांच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी अशोक रसाळ यांनी उपस्थित महिलांना वृक्षांचे संगोपन करण्याचे आवाहन करताना सांगितले की, आज लावलेली ही रोपे जपून त्यांचे भविष्यात वटवृक्षात रूपांतर करा. हाच लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना खरा वाढदिवसाचा आशीर्वाद ठरेल. या उपक्रमामुळे लाभार्थी महिलांच्या चेहऱ्यावर उमटलेला ◀◀ पान ३ वर

## तीन ऑगस्ट रोजी जिल्हा सहकारी निबंधक कार्यालय व लीड बँक कार्यालयाला टाळे ठोकणार

माजलगाव । प्रतिनिधी

सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली, पण आजही शेतकरी कर्जमाफीच्या नावाखाली बँकांचे उंबरठे झिजवत आहे. प्रत्येक बँकेत आणि सहकार खात्यात शेतकऱ्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. त्यामुळे कर्जमाफीबाबत मोठा गोंधळ निर्माण झाला आहे.

कर्जमाफीची प्रक्रिया वेळेत पूर्ण झाली नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना वेळेवर पीककर्ज मिळाले नाही. परिणामी, शेतकऱ्यांना उसनेवारी करून पेरणी करावी लागली. आता कर्जमाफीसाठीही त्यांनाच वारंवार बँका आणि



कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत.

आमची स्पष्ट मागणी आहे की, २ ऑगस्टपर्यंत प्रत्येक तालुका व जिल्हा स्तरावर सहकार खात्याचा एक अधिकारी आणि लीड बँकेचा एक अधिकारी बसवून शेतकऱ्यांना कर्जमाफीबाबत ◀◀ पान ३ वर

## पात्रुड लऊळ रस्त्याची दयनीय अवस्था

**मनसबदार गार्डन मंगल कार्यालयासमोर रस्त्यावर मोठमोठे खड्डे**

पात्रुड । प्रतिनिधी

तालुक्यातील पात्रुड लऊळ तसेच या रस्त्यावरून माजलगाव ते पिंपळनेर बीड ही बस सेवा चालू असून हा रस्ता ठिकठिकाणी उधडलेला आहे. त्यामुळे रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असून सध्या पावसाळा असल्याने पूर्ण रस्ता हा जलमय झालेला आहे.

पात्रुड लऊळ हा रस्ता महत्त्वाचा रस्ता असून या रस्त्यावरून माजलगाव बीड अशी रहदारी आहे या रस्त्याने अनेक गावातील नागरिक प्रवास करत असतात परंतु हा रस्ता अनेक



ठिकाणी उधडुन रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. सध्या पावसाळा ऋतू चालू असल्याकारणाने या खड्ड्यामध्ये पावसाचे पाणी साठत आहे यामुळे रस्ता हा जलमय झालेला आहे. या रस्त्यावरून प्रवास करण्यासाठी चालणाऱ्या वाहनांना मोठी तारेवरची कसरत करत ते जा करावी लागत आहे. वाहनधारकांना रस्त्यावर खड्डे आहेत का! खड्ड्यामध्ये रस्ते आहेत? हेच समजत नसल्यामुळे दैनंदिन अपघाताची संख्या वाढत चाललेली आहे. गेली अनेक वर्षापासून पात्रुड येथील मनसबदार गार्डन मंगल कार्यालयासमोर भला मोठा खड्डा आहे. या खड्ड्यातून अनेक प्रवासी आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत. ◀◀ पान ३ वर

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान: आज परळी येथे समाधान शिबिर

बीड । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तहसील कार्यालय, परळी वैजनाथ यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मुक्ताई लॉन्स, इटके कॉर्नर, शासकीय विश्रामगृहाजवळ, परळी वैजनाथ येथे होणार आहे.

या शिबिरास आमदार धनंजय मुंडे, मंत्री पंकजाताई मुंडे, बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग सोनवणे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे-जिरंगे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार विनोद रनवरे, तहसीलदार विलास तरंगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शिबिरामध्ये नागरिक, शेतकरी व विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजनांची माहिती तसेच योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना दाखले, मंजुरीपत्रे तसेच आर्थिक धनादेशांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात येणार आहे. परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व लाभार्थी, शेतकरी, नागरिक, विद्यार्थी व ग्रामस्थांनी या समाधान शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तहसील कार्यालय, परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## गंभीर गुन्ह्यात ॲड. तेजस नेहरकर यांनी तीन आरोपींना मिळवून दिला डिफॉल्ट जामीन

बीड । प्रतिनिधी

घटनेची हाकिकत आशि की आष्टी पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा रजिस्टर क्र. ०१४५/२०२६ मध्ये आप्पा साहेबराव फुलमाळी, महेश बुरा गायकवाड व राजू महेश गायकवाड या आरोपींवर भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत कलमे ११५(२), ११८(१), ११८(२), १८९(२), १९१(२), १९०, ३५१(२) व ३५२ अन्वये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला होता. गायरान जमिनीच्या ताब्यावरून झालेल्या वादातून मारहाणीची घटना घडल्याचा आरोप फिर्यादीने केला होता .फिर्यादीचे डोक्याला गंभीर मार होता व हा हल्ला जीव घेण्याच्या प्रयत्नातून केला होता अशा फिर्यादी मध्ये नमूद केल्यामुळे



या प्रकरणात आरोपींचे नियमित जामीन अर्ज यापूर्वी माननीय जिल्हा व सत्र न्यायालय, बीड तसेच माननीय उच्च न्यायालय, हायकोर्ट औरंगाबाद खंडपीठ औरंगाबाद यांनी नामंजूर केले होते. सदरचे प्रकरण न्यायालयात अंडर ट्रायल चालणार हे निश्चित झाले होते , त्यानंतर आरोपींच्या वतीने ड. तेजस सुभाष नेहरकर यांनी प्रकरणाचा सखोल अभ्यास करून, तपास यंत्रणेने कायद्यानुसार विहित मुदतीत दोषारोपपत्र दाखल न केल्यामुळे आरोपींना डिफॉल्ट जामीन हा कायद्याने बहाल केलेला हक्क असल्याचा मुद्दा प्रभावीपने मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब आष्टी यांचे न्यायालयासमोर अभ्यासपूर्ण कायद्याच्या कक्षेत राहून उच्च न्यायालय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे मांडला व माननीय न्यायालयाच्या लक्षात आणून दिले की आरोपीचा जामीन मिळवण्याचा अधिकार आहे हक्क व कायदा त्या कायद्यामध्ये नियमांने आरोपींना जामीन मंजूर करावीच लागते अशी न्यायाची मागणी केली ड. नेहरकर यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीमुळेच तसेच त्यांची कायद्यावरील भक्कम अभ्यासाची पकड आणि ◀◀ पान ३ वर

## डोंगरकिन्ही गटातील शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण, 'ग्रीस्टॅक' नोंदणी करावी-ॲड. कवठेकर यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्मभूमी योजना २०२६ अंतर्गत डोंगरकन्हिी गटातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेली आधार प्रमाणीकरण प्रक्रिया आणि 'ग्रीस्टॅक' नोंदणी तातडीने पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड.प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.



शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी विचारात घेऊन शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत. कर्जमाफी, पीक कर्ज, विविध अनुदाने, नैसर्गिक आपत्तीची मदत आणि इतर शासकीय योजनांचा थेट लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांची आधार पडताळणी तसेच ग्रीस्टॅक प्रणालीवरील डिजिटल नोंदणी पूर्ण असणे अनिवार्य करण्यात आले आहे. डोंगरकन्हिी गटातील बहुतांश शेतकरी पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहेत. आर्थिक अडचणींच्या काळात मिळणारी कर्जमाफी त्यांच्यासाठी मोठा दिलासा ठरू शकते. परंतु केवळ तांत्रिक प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यामुळे पात्र असूनही एखादा शेतकरी लाभापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी याकडे गांभीर्याने पाहून आपली कागदपत्रे आणि नोंदणी तात्काळ पूर्ण करून घ्यावी, असे ड.कवठेकर यांनी स्पष्ट केले. दरम्यान, केवळ प्रक्रियात्मक किंवा तांत्रिक त्रुटींमुळे एकही पात्र शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाने सकारात्मक व गतीमान पावले उचलावीत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## धामणगावच्या शेतकऱ्याची डाळिंब शेती ठरली आदर्श दीड एकरातून तब्बल २३ लाखांचे उत्पादन

आष्टी । शरद रेडेकर

पारंपरिक पिकांबरोबरच फळबागांची लागवड आणि आधुनिक शेती तंत्राचा अवलंब केल्यास शेतीही अत्यंत फायदेशीर ठरू शकते, याचे प्रेरणादायी उदाहरण धामणगाव येथील प्रगतिशील शेतकरी बबन अण्णा चौधरी यांनी घालून दिले आहे. दीड एकर क्षेत्रात शरद किंग-३ जातीच्या डाळिंबाची बाग फुलवत त्यांनी अवघ्या पहिल्याच प्लॉटमध्ये तब्बल २३ लाख रुपयांचे उत्पादन घेऊन परिसरातील शेतकऱ्यांसमोर



आदर्श निर्माण केला आहे.

माळरानावरील दीड एकर क्षेत्रात सुमारे ६०० डाळिंबाच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे. रासायनिक खतांपेक्षा सेंद्रिय खतांचा अधिक वापर, नियोजनबद्ध पाणी व्यवस्थापन आणि बागेची सातत्यपूर्ण निगा यामुळे डाळिंबाचा

**सेंद्रिय शेतीचा प्रयोग यशस्वी; डाळिंब बागेच्या उत्पन्नातून खरेदी केली तालुक्यातील पहिली टाटा सियारा**

दर्जा उत्कृष्ट राहिला. परिणामी बाजारपेठेत त्यांच्या फळाला चांगला भाव मिळाल्याने विक्रमी उत्पादनाचा टप्पा गाठता आला.

याबाबत बोलताना शेतकरी बबन अण्णा चौधरी म्हणाले, शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता आंतरपिकांसह डाळिंबासारख्या फळबागांकडे वळले, तर निश्चितच आर्थिक प्रगती साधता येईल. सेंद्रिय शेतीमुळे उत्पादनाचा दर्जा वाढतो आणि बाजारातही अधिक दर मिळतो.

दरम्यान, या डाळिंब बागेच्या उत्पन्नातून त्यांचे चिरंजीव संपत चौधरी यांनी तालुक्यातील पहिली टाटा सियारा खरेदी केल्याचे सांगितले. शेतीमधूनही मोठे आर्थिक यश मिळवता येते, हा विश्वास चौधरी कुटुंबाने आपल्या यशस्वी प्रयोगातून सिद्ध करून दाखवला असून त्यांच्या या उपक्रमाचे परिसरातील शेतकरी कौतुक करत आहेत.

## गुरुपौर्णिमेनिमित्त भव्य पालखी सोहळा उत्साहात संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त श्री स्वामी सेवा केंद्र, क्रांतीनगर, पाटोदा येथे श्री स्वामी समर्थ महाराजांचा भव्य पालखी सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. दिंडोरी प्रणीत सेवा मार्ग, गुरुप्रणीत गुरुपीठ आणि परमपूज्य गुरुमाऊली यांच्या आशीर्वादाने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात शहरातील शेकडो भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सकाळी ८ वाजता पालखी प्रदक्षिणेला प्रारंभ झाला. महासांगवी रोड, राजमोहम्मद



चौक, मुख्य बाजारपेठ, आंबेडकर चौक आणि रेणुकामाता मंदिर मार्गे पालखीची मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर पालखीची सांगता श्री स्वामी सेवा केंद्र, क्रांतीनगर येथे करण्यात आली.

पालखी सोहळ्यात पुरुष, महिला तसेच लहान मुलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. लहान मुलांनी साकारलेल्या विविध धार्मिक व प्रेरणादायी वेशभूषांनी

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26